# अर्थबोधपत्रिका

अंक ८ मार्च २०००

महत्त्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयांवरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

---

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोध पत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोध पत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जानेवारी २००० पासून अर्थबोधपत्रिकेचे दुसरे वर्ष सुरू झाले असून दुसऱ्या वर्षाचा हा दुसरा अंक आहे. सलग क्रमांकानुसार हा आठवा अंक आहे.

सहा अंक मिळविण्यासाठी देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा.

**अर्थबोधपत्रिका : अंक ८ : मार्च २०००**

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** : राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता** : संपादक, अर्थबोधपत्रिका, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

# अर्थबोधपत्रिका

अंक ८ मार्च २०००

महत्त्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयांवरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

-----------

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.
फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## महत्त्वाकांक्षा हे स्वार्थाचेच एक रूप

आपल्याला केवळ माहिती व तांत्रिक प्रशिक्षण न देता, मानवी समस्या समजून घेऊन त्यांना तोंड देण्यासाठी आपण शिक्षणामुळे तयार व्हावे हे महत्त्वाचे नाही काय? कारण असे पाहा, जीवन हे काही एवढे सोपे नाही. आतापर्यंतचा तुमचा काळ सुखात गेला असेल, हौसेने नवनिर्मिती करण्यात गेला असेल, तुम्ही परिपक्व झाला असाल, पण तुम्ही शाळेतून पुढे गेलात की एकेक घटना घडत जातील व त्या तुम्हांला संकुचित करतील, मर्यादित करतील आणि हे केवळ तुमच्या वैयक्तिक संबंधांमुळेच नव्हे तर तुमच्यावरील सामाजिक प्रभावातून, तुम्हांला वाटणाऱ्या भीतीतून व यशस्वी होण्याच्या अपरिहार्य महत्त्वाकांक्षेतूनही घडेल.

महत्त्वाकांक्षी असणे हा एक शाप आहे असे मला वाटते. महत्त्वाकांक्षा हे स्वार्थाचेच एक स्वरूप असते. स्वतःला संकुचित करण्याचाच एक प्रकार असतो, आणि म्हणून तिच्यामुळे मनाला जाड्य येते. महत्त्वाकांक्षेने भरलेल्या या जगात महत्त्वाकांक्षा न ठेवता जगणे म्हणजे खरोखर कोणत्याही बक्षिसाची, फळाची, मोबदल्याची अपेक्षा न धरता एखाद्या गोष्टीवर निव्वळ निर्व्याज प्रेम करणे होय. आणि हे फार अवघड आहे; कारण सर्व जग, तुमचे सगळे मित्र, तुमचे सगळे नातलग, प्रत्येकजण यश मिळविणे, स्वार्थपूर्ती करणे, यासाठी व कोणीतरी बनवण्यासाठी धडपडत आहे. पण हे सर्व समजून त्यातून मुक्त होणे व तुम्ही खरोखर ज्या गोष्टीवर प्रेम करता ती गोष्ट कोणतीही असो, कितीही हलकी, उपेक्षित असो, ती करणे, ही गोष्टच एक विलक्षण थोरपणाची भावना जागृत करते - त्या थोरपणाच्या भावनेला कोणाच्याही पसंतीची, बक्षिसाची कधीही अपेक्षा नसते. त्या भावनेतून केवळ कृतीसाठीच कृती केली जाते आणि म्हणून तिच्याठायी सामान्यपणाच्या ओघात न सापडण्याचे सामर्थ्य असते.

**जे. कृष्णमूर्ती**

'भावी जीवन' या पुस्तकातून

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | ५ |
| १. | एकविसावे शतक सर्वांचेच | ६ |
| २. | युरोचा वर्षाचा प्रवास | १२ |
| ३. | स्वातंत्र्य आणि समानता | १४ |
| ४. | लोकशाहीतील नागरिकांचे समाधान | १७ |
| ५. | लोकशाही आणि दबावगट | १९ |
| ६. | बुद्धिमत्तांचा शोध घेते ते शिक्षण ! | २३ |
| ७. | अमेरिकेतील कुटुंबे टिकणार ? | २६ |
| ८. | मुक्त जागतिक व्यापार | २८ |


---

**सूचना**

● अर्थबोधपत्रिकेच्या सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकाच्या शेवटी दिलेला आहे. कोणत्याही अंकापासून सभासद होता येते.

● या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.

● अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रांत प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख प्रसिद्ध केल्यावर 'अर्थबोधपत्रिका - भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी च्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.

● लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

# वाचकांचा प्रतिसाद

**प्राथमिक** शिक्षणाबरील अर्थबोधपत्रिकेचा अंक आवडला. या अंकातील सर्व मुद्यांचे वाचन केल्यानंतर 'शिक्षण' हा केवळ शैक्षणिक प्रश्न नसून त्यांच्या आर्थिक, सामाजिक बाजू देखील तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत, याविषयी खात्री पटते. वस्तुस्थितीदर्शक माहिती सादर करून आपण जागरूक समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीची पन्नास वर्षे पार करून देखील आजही 'निरक्षरता' या शापातून आपण मुक्त होऊ शकलो नाही, याचाच खेद वाटतो. शिवाय पुस्तकी विद्येच्या पलिकडे शिक्षण देण्याचे आपले प्रयत्नही तोकडे पडतात याचीही जाणीव होते. आचार्य विनोबा भावे यांची 'वर्तणुकीतील बदल म्हणजेच शिक्षण' ही सोपी, सुटसुटीत व्याख्या आचरणात आणावयास हवी. स्तुत्य उपक्रमाबद्दल धन्यवाद.

डॉ. महेश कुलकर्णी, नाशिक

**अर्थबोध** पत्रिकेचा अंक आवडतो आहे, कार्यकर्त्यांच्या अभ्यासासाठी चांगला आहे. स्वदेशी संबंधित दिलीप कुलकर्णींचा पत्र-लेख आवडला. निखळ अर्थशास्त्रीय विचार आणि जीवनशैली यांचा मेळ घालणं आवश्यक आहे असं वाटतं.

नयना सहस्त्रबुद्धे, ठाणे

## • निवेदन •

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी तर्फे पुढील पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या आहेत - (१) भारतातील लोकसंख्या वाढीचा प्रश्न : *लेखिका - कुमुदिनी दांडेकर* (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इंग्रजी पुस्तिका) : *लेखक - जयकुमार अनगोळ* (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण (मराठी पुस्तिका) : *लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - रमेश पानसे*

प्रत्येक पुस्तिकेची किंमत ३०/- रुपये आहे. पण 'अर्थबोध पत्रिके'च्या सभासदाना ती २५/- रुपयांमध्ये देण्यात येईल. पुस्तिकेची किंमत चेक / ड्राफ्ट/ मनी ऑर्डर द्वारे पाठवावी. चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावाने काढावा. पुण्याबाहेरील चेकमध्ये १५/- रुपयांची रक्कम वटणावळीचा खर्च म्हणून समाविष्ट करावी. मनी ऑर्डर करताना मजकुराच्या जागी आपले संपूर्ण नाव व पत्ता लिहावा. **चौकशीसाठी पत्ता :** संचालक - भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे - ४११ ०१६.

## संपादकीय

अर्थबोधपत्रिकेचा हा 'आठवा' अंक आहे. या अंकात नव्याने एक प्रयत्न करण्यात आला आहे. वाचकांच्या तो ठळकपणे लक्षात येईल आणि त्यांना तो आवडेलही. मराठी वाचकांपुढे आणावे असे कितीतरी वैचारिक वाङ्मय इंग्रजीतून प्रसिद्ध होत असते. 'अर्थबोध पत्रिके'च्या मर्यादित पानांमध्ये अधिकाधिक विषयांवरील मजकूर यावा या हेतूने छोटे, म्हणजे कमी पानांचे, लेख जास्त दिले आहेत. जी वृत्तपत्रे व नियतकालिके असे लेख पुनर्मुद्रित करू इच्छितात, त्यांचीही सोय होणार आहे. शिवाय या अंकाची विविधताही यामुळे वाढली आहे.

मागील अंकात, 'तंत्रज्ञान व नवीन समाजव्यवस्था' या संदर्भातील, एकविसाव्या शतकात डोकावून पाहणारा लेख दिला होता; त्याच धर्तीचा एक लेख या अंकात सुरूवातीलाच देण्यात आला आहे. तसेच अलीकडेच जागतिक व्यापार संघटनेच्या सिएटल येथे झालेल्या आणि गाजलेल्या सभेशी जोडून, परंतु पुढच्या काळासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या या विषयावरचा लेख या अंकात शेवटी देण्यात आला आहे.

तीन लेख लोकशाहीशी संबंधित विषयांवरील आणि तरीही वेगवेगळ्या अंगांचे दर्शन घडविणारे लेख, हे या अंकाचे वैशिष्ट्य ठरेल. यूरो चलनाचे अप्रुप आता राहिले नाही. परंतु, यूरोच्या वर्षभरच्या वाटचालीचे चित्र आपणास माहिती व्हावे या हेतूने, यासंदर्भातील एक लेख देण्यात आला आहे.

वाचकांचे मुद्दाम लक्ष वेधायचे आहे ते एका नव्या संशोधनाची ओळख करून देणाऱ्या आणि त्याच्या शैक्षणिक क्षेत्रावर घडून येणाऱ्या परिणामांची चर्चा करणाऱ्या 'बुद्धिमत्तांचा शोध घेते ते शिक्षण!' या छोटेखानी लेखाकडे. या दिशेने घडत असलेल्या घडामोडींचा वेध पुढील काही अंकांमधूनही घेण्याचा आमचा विचार आहे. आपल्या प्राथमिक शिक्षणाच्या ढाच्यामध्येच आमूलाग्र बदल करावा लागेल, याचे सूचन जे या लेखामधून करण्यात आले आहे, ते खूप महत्त्वाचे आहे.

वाचकांना 'अर्थबोधपत्रिका' आवडते आहे, हे त्यांची येणारी पत्रे आम्हाला सांगतातच. पण, याचा लाभ इतरांनाही मिळावा यासाठी वाचकांनी, अंकाच्या आपल्या प्रतीत अखेरीस असणाऱ्या अर्जाचा उपयोग करून आपल्या संबंधितांपैकी कोणाला वर्गणीदार करून घ्यावे, अशी विनंती आहे.

पत्रिकेविषयी वाचकांनी आपली मतेही जरूर कळवीत राहावे.

■■

# १ एकविसावे शतक सर्वांचेच

हार्लन क्लिव्हलँड हे राजकीय विषयांवरील तज्ज्ञ असून अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली आहेत. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांचे सहाय्यक मंत्री, 'नाटो'मध्ये अमेरिकेचे राजदूत, संयुक्त राष्ट्रसंघाच्या मदतकार्य विभागाचे प्रमुख अशी ज़बाबदारीची कामे त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. शिक्षण क्षेत्रातही त्यांना विशेष रस असल्याने हवाई (Hawaii) युनिव्हर्सिटीचे अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले. तेथे ते दोनदा डीन झाले. ते स्वतः लेखक असून त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. सध्या ते कला व विज्ञानाशी संबंधित जागतिक अकादमीचे अध्यक्ष आहेत. एकविसाव्या शतकाकडे जाताना आपला दृष्टिकोण कसा आहे, कसा हवा याबाबत त्यांनी लिहिलेला लेख 'फ्युचर्स' (Futurs) या ब्रिटन मधील मासिकात नुकताच प्रसिद्ध झाला होता. या लेखातील हार्लन क्लिव्हलँड यांची काही महत्त्वाची मते प्रसिद्ध करीत आहोत.

एकविसावे शतक कसे असेल यावर अनेक बाजूंनी चर्चा चालू आहे. प्रत्येक गट आपलेच बरोबर आहे असे समजून चालत आहे. पण एक गोष्ट मात्र ठळकपणे दिसते आहे ती म्हणजे 'हे शतक कुणाचेच असणार नाही पण ते सर्वांचेच असेल.' म्हणजेच हे 'जागतिक शतक' असेल. याचे कारण विसाव्या शतकाअखेरीस झालेले दहा महत्त्वाचे बदल हे होय. हे बदल परस्परांशीसंबंधित असून ते परस्परावलंबी देखील आहेत. हे बदल असे :

**१. जागतिक सुरक्षा :** विज्ञानामुळे शस्त्रास्त्रांमध्ये झालेली आधुनिक सुधारणा, शत्रूची वित्तंबातमी त्वरित मिळण्याची सोय, जगाला विनाशाच्या कडेवर नेऊन ठेवणारी रासायनिक व आण्विक शस्त्रे यामुळे देशादेशांमधील संरक्षण विभागाला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे लढाईच्या, युद्धाच्या समीकरणांना वेगळे वळण मिळाले आहे. युद्ध टाळण्याकडे अनेक राष्ट्रांचा कल आहे कारण, मोठ्या युद्धाचा खर्च परवडणार नाही ही एक बाब आणि दुसरी म्हणजे युद्धामुळे होणारा विनाश जग नष्ट करू शकतो याची झालेली जाणीव. पण याचबरोबर, जगात सतत छोटी छोटी युद्धे कुठे ना कुठे चालू आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजे संरक्षण हा जागतिक पातळीवरील एक महत्त्वाचा मुद्दा आहे. याचा विचार करूनच अनेक राष्ट्रे आपली धोरणे ठरवीत आहेत.

२. **जैवतंत्रज्ञान :** विज्ञानाने मानवासमोर विविध विषयांचा खजिना उघडला असे म्हणता येईल, इतकी प्रगती विज्ञानामुळे मानवाने केली. जैवतंत्रज्ञान व त्यातील क्लोनिंग आणि इतर तपशिलाच्या बाबी बघितल्या की थक्क व्हायला होते. माणसाच्या क्लोनिंगच्या कल्पनेने तर या सर्वांवर कहरच केला आहे. ही प्रगती माणसाला कुठे घेऊन जाईल ते सांगता येत नाही.

३. **संगणक :** एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या माणसांच्या मनात व कामात संगणकाने, मोबाईल फोनने महत्त्वाची जागा मिळविली आहे. तुमचे शिक्षण कोणतेही असो, तुम्ही निवडलेला व्यवसाय कोणताही असो, संगणकाच्या वापराशिवाय तुम्ही पुढे जाऊच शकणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजाचे स्वरूपही बदलले आहे. याचा परिणाम सर्वच देशांतील नागरिकांवर थोड्याफार फरकाने झाला आहे.

४. **दळणवळणाच्या आधुनिक सोयी :** जगाच्या एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत काही सेकंदात संवाद साधण्याच्या अत्याधुनिक यंत्रणांमुळे व्यवहाराचे स्वरूप लक्षणीयरीत्या बदलले आहे. आर्थिक व व्यापारी घडामोडींमध्ये हा बदल लगेचच जाणवतो. उपग्रहांच्या मार्फत होणाऱ्या या दळणवळणाचा उपयोग करून मानवाने इतर अनेक क्षेत्रात वेगाने बदल घडवून आणले आहेत.

५. **नव्या ज्ञानाचा व तंत्रज्ञानाचा प्रसार :** विविध माध्यमांद्वारे हे नवनवे ज्ञान लोकांच्या दारात पोचले आहे. दूरचित्रवाणी व संगणक घरोघरी पोचत आहेत. त्यामुळे ज्ञानावर मक्तेदारी राहिलेली नाही. नवीन तंत्रज्ञानाकडे तर बहुतेकांचा ओढा आहे. त्यामुळे अधिकारशाही मागे पडून परस्पर सहकार्य, मतैक्य या बाबींना महत्त्व आले आहे. याला 'कौशल्य क्रांती' (Skill Revolution) असे म्हणता येईल.

वरील बदल हे विज्ञान व तंत्रज्ञानातील नव्या शोधांमुळे झाले आहेत तर इतर काही बदल हे या सर्वांचा परिणाम म्हणून पुढे आले आहेत असे म्हणता येईल. उदाहरणार्थ,

६. **मानवाधिकारांचा आग्रह :** विविध गटांच्या मानवाधिकारांबाबत आज एक प्रकाराची सजगता आढळून येत आहे. या विविध गटांमध्ये अल्पसंख्य, राजकीय हक्कांपासून वंचित राहिलेले गट, महिला, मुले, वृद्ध व्यक्ती, वर्णभेदामुळे-वंशभेदामुळे अन्याय्यग्रस्त घटक, निर्वासित अशा अनेकांचा

समावेश आहे. पण अद्याप या सर्वांना मानवाधिकार पूर्णांशाने मिळाले आहेत असे नाही. त्यामुळे एकविसाव्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर याचा विचार प्रामुख्याने करण्यात येईल असे वाटते.

**७. वाढता असंतोष :** ज्ञानाचा, विज्ञानाचा जसजसा प्रसार होतो आहे तसतसे आपण काय गमावले, आपल्याला काय मिळू शकले नाही, आपल्यावर कसा अन्याय झाला हे विविध गटातील वंचितांना कळून चुकले व त्यामुळे त्यांच्यातील असंतोष वाढला. त्यांच्या मागण्यांना जोर आला. हा असंतोष विविध माध्यमांद्वारे सर्वांपर्यंत पोचला. अशा अन्यायग्रस्तांसाठी कार्य करणाऱ्या अनेक स्वेच्छाकार्य संस्था, ई-मेल व इंटरनेटचा वापर करून आपले काम सर्वसामान्यांपर्यंत पोचवीत आहेत.

**८. कट्टर संस्कृतीरक्षक आणि जागतिकीकरण :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक संस्कृतींचा परस्परांशी संबंध येतो आहे. काळाप्रमाणे संस्कृतीत बदल होणे अपरिहार्य असते. पण संस्कृतीचा अभिमान बाळगणारे, आपणच खरे संस्कृती रक्षक आहोत असे समजतात व ते जग एक होण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण करतात. एखाद्या देशातील राष्ट्रीयता, धर्म, वैचारिक तत्वे, वंश, परंपरा हे सर्व विषय दुसऱ्या देशातील अशाच विषयांसमोर येऊन थांबतात आणि 'आम्ही' विरूद्ध 'तुम्ही' असा एक संघर्ष उभा राहतो. भविष्यात हा संघर्ष वाढेल की कमी होईल हे आत्ताच सांगता येत नाही.

**९. पर्यावरण :** मुक्त व्यापाराच्या संकल्पनेत, विविध वस्तूंचे उत्पादन व वितरण जागतिक पातळीवर होऊ शकते, असे स्पष्ट असल्याने जगातील अनेक ठिकाणचे पर्यावरण धोक्यात येऊ शकते. त्यामुळे एकविसाव्या शतकात 'पर्यावरण' या विषयाला महत्त्व देण्यात येईल.

**१०. मुक्त व्यापार :** मुक्त व्यापाराचे तत्त्वज्ञान जगाच्या कानाकोपऱ्यात हळूहळू पसरत असून त्यामुळे बाजारपेठेतील स्थानिकता लोप पावत आहे. व्यापाराच्या पूर्वीच्या कल्पना, पद्धती पूर्णपणे बदलत आहेत. अनेक कंपन्यांचे विलिनीकरण होत आहे. यामुळे होणारे बदल हा एकविसाव्या शतकात चर्चेचा / वादाचा मुद्दा असेल.

यात महत्त्वाचे असे की हे सर्व बदल एकमेकांशी कोणत्या ना कोणत्या सूत्राने बांधले गेले आहेत. एकातून दुसऱ्याची निर्मिती असेही झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे मानवी दृष्टिकोणातून याचा विचार करता यावा यासाठी जगभरातील जैवतंत्रज्ञ, पर्यावरणवादी, अध्यात्मिक-धार्मिक गुरू,

विविध विषयांतील शास्त्रज्ञ, साहित्यिक, बुद्धिवादीनागरीक या सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. कुठे कुठे असे प्रयत्न सुरुही झाले आहेत.

वरील सर्व बदलांच्या पार्श्वभूमीवर आपण भविष्याचा विचार केला तर असे लक्षात येते की माहिती तंत्रज्ञानामुळे जगात अनेक क्षेत्रांमधील समीकरणे बदलू शकतात. नव्हे माहिती तंत्रज्ञान (Information Technology) हा विषय इतर सर्व विषयांचे एका अर्थाने नेतृत्त्व करेल. या तंत्रज्ञानात आपली परंपरागत जुनी मते बदलण्याचे सामर्थ्य आहे. या नवीन तंत्रज्ञानाचे, माहितीचे खालील सहा गुण आपण लक्षात घेतले पाहिजे. **एक** म्हणजे, माहितीचा हा साठा संपणारा, नष्ट होणारा नाही. उलट जितका त्याचा वापर जास्त तितका तो समृद्ध होत जाईल. **दुसरे** म्हणजे, प्रकाश जितक्या वेगाने पसरतो तितक्याच वेगाने माहिती पसरू शकते. **तिसरे** म्हणजे, माहिती लपून राहणारी किंवा तिजोरीत बंद ठेवता येणारी गोष्ट नाही. ती चटकन 'लीक' होते. **चौथे** म्हणजे, माहिती कुणाच्याच मालकीची नसते. **पाचवे** म्हणजे, माहिती देणे किंवा घेणे ही व्यापारी अर्थाने खरेदी-विक्री नसते. **सहावे** म्हणजे, माहिती ही समजून घेण्याची, वाटून घेण्याची क्रिया आहे.

नव्या शतकाचा विचार करताना आपण माहिती व माहिती तंत्रज्ञानाचे गुण लक्षात घेतले तर काही बाबी स्पष्ट होतात. त्यातील महत्त्वाच्या बाबींचा आपण विचार करू.

- माहिती तंत्रज्ञानामुळे जगभर पसरत असलेल्या नवनवीन कल्पनांचे (Ideas) जागतिकीकरण व व्यापाराचे जागतिकीकरण आपण रोखू शकणार नाही. किंबहुना अशा काही गोष्टी स्विकारणे वा न स्विकारणे हा कोणत्याही देशाच्या, व्यक्तीचा धोरणात्मक भाग राहणार नाही. ही एक वस्तुस्थिती म्हणूनच आपल्याला मान्य करावी लागेल.

- व्यक्ती-व्यक्तींमधील, समाजा-समाजांमधील, राष्ट्रा-राष्ट्रांमधील विविधतेला मान्यता देणे हा नव्या जगाचा कायदाच असेल. पण विविधता नष्ट करण्याचा जर प्रयत्न झाला तर तो धोकादायक ठरू शकतो. 'आम्ही' विरूद्ध 'तुम्ही' असा दृष्टिकोण न ठेवता 'आपण' आणि 'ते' असा दृष्टिकोण ठेवला तर परस्पर सहकार्य, सद्भावना वाढीस लागेल.

- 'समाजा'ची परंपरेनुसार चालत आलेली व्याख्या किंवा त्याचे स्वरूप बदलेल. भौगोलिकदृष्ट्या एका ठिकाणी राहणारा, धार्मिक दृष्ट्या एकसंघ असणारा, समान चालीरीतींच्या दृष्टिकोणातून व्यवहार करणारा मानवांचा एक

गट किंवा समूह म्हणजे समाज असे स्वरूप आता राहीलच असे नाही. लांब अंतरावरील प्रवास कमी वेळात होत असल्याने आणि परस्परांशी काही सेकंदातच संवाद साधणे शक्य होत असल्याने भौगोलिकतेला फारसा अर्थ राहणार नाही. पण समान आवडी-निवडी व समान अंतःप्रेरणा (Motivation) असलेल्या व्यक्तींचा जगभर पसरलेला समूह तो एक 'समाज' असेल, असेही घडू शकते.

● नव्या अर्थव्यवस्थेतील वेगाने होणारे बदल पाहता असे वाटते की आत्तापर्यंत ज्या ज्या क्षेत्रात काही नवीन घडले नाही, तिथे आर्थिक विकास जास्त प्रमाणात होईल.

● गरीब व श्रीमंत राष्ट्रांमधील दरी आणि देशा-देशांतील नागरिकांमधील गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी वाढतेय. पण माहितीच्या प्रसारामुळे अनेक नागरीक, असे का घडतेय याचा शोध घेऊ शकतील आणि नेत्यांना अशी धोरणे बदलण्यास भागही पाडू शकतील. पण नागरिकांनी सजगता दाखविली तरच, अन्यथा जे त्यांनी आपणहून ओढवून घेतले आहे ते त्यांना स्विकारावे लागेल. (People will get what they deserve)

● सर्वांपर्यंत शिक्षण पोचविल्याशिवाय राष्ट्रे सर्वांगीण प्रगती करू शकणार नाहीत. आणि सर्वांगीण प्रगती झाल्याशिवाय अनेक राष्ट्रे स्वबळावर पुढेही जाऊ शकणार नाहीत. त्यामुळे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर दिला जाईल.

● औद्योगिक क्षेत्रात परस्पर सहकार्याचे धोरण महत्त्वाचे ठरेल. एकानेच आदेश ठरवायचे व इतरांनी त्यांचे पालन करायचे असे होणार नाही. खालपासून वरपर्यंत विचार विनिमय करणे, एकत्रित चर्चा करणे, एकमत तयार करणे या लोकशाही प्रक्रिया सर्वच क्षेत्रांसाठी महत्त्वाच्या ठरतील. एकाच दृष्टिकोणातून विचार न करता विविध दृष्टिकोणांचा विचार करून सर्वसंमतीने, सहमतीने निर्णय घेऊ शकणाऱ्या व्यक्तीच 'नेता' म्हणून समाजमान्य होतील.

## शिक्षण क्षेत्र महत्त्वाचे ठरेल

वरील बाबींवरून असे लक्षात येते की एकविसाव्या शतकातील समाजात सर्वंकष विचार करू शकणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढावयास हवी. अशा व्यक्ती घडविणे हे शिक्षणक्षेत्राच्या अखत्यारीतील काम आहे म्हणून सध्या अस्तित्वात असलेली शिक्षणपद्धती पुन्हा एकदा तपासून बघावी लागेल. विद्यार्थ्यांना एक विषय शिकताना त्याच्याशी संबंधित अनेक बाबींचा विचार

करणे आवश्यक आहे हे शिकविले गेले पाहिजे. कारण संपूर्ण जगातील असंख्य बाबी अशा परस्पर सूत्राने बांधल्या गेल्या आहेत. कोणत्याच एका दृष्टिकोणातून मानवाची सर्व बाजूंनी प्रगती होणार नाही किंवा प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी जगाचा एकसंध विचार (Integrative thinking) करायला लावणारे शिक्षण आवश्यक ठरेल.

त्यामुळे एकविसाव्या शतकात शिक्षणक्षेत्राला एका मोठ्या आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे. अशिक्षितांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घ्यायचे हा एक मोठा टप्पा पार पाडतानाच त्यांना जगातील असंख्य घटकांचा परस्परसंबंधही समजावून द्यायचा आहे. हा संबंध आणखी चांगला कसा होईल याचा विचार करून कृती करण्याची गरज जाणवणार आहे. बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण या सर्वच पायऱ्या यादृष्टीने महत्त्वाच्या ठरणार आहेत. कारण एकात्मिक विचार करायला प्रवृत्त करणारे शिक्षण ही भविष्यातील गरज असून ती विद्यार्थ्यांच्या जडण-घडणीचाच एक भाग बनावी लागणार आहे. जगाच्या उज्ज्वल भवितव्याविषयी आस्था बाळगणाऱ्या सर्वच घटकांना यासाठी एकत्रित प्रयत्न करावे लागतील.

■■

## चतुरस्त्रता महत्त्वाची

*जगप्रसिद्ध व्हायोलिनवादक आयझॅक स्टर्न यांच्या एका कार्यक्रमात घडलेली ही घटना. आस्पेन इन्स्टिटयूटमधील एका कार्यक्रमात एका श्रोत्याने स्टर्न यांना प्रश्न विचारला की अनेक व्हायोलिनवादकांचे कार्यक्रम मी ऐकले आहेत. आपण ज्या धून वाजविता किंवा स्वर काढता अगदी तसेच ते काढतात. पण ते स्वर तुमच्या स्वरांसारखे कर्णमधुर का वाटत नाहीत? आयझॅक स्टर्न एक मिनिट अवाक झाले. काय उत्तर द्यावे त्यांना सुचेना पण मग लगेच ते म्हणाले, की स्वर महत्त्वाचे नसतात तर दोन स्वरांमधील जागा या महत्त्वाच्या असतात. त्यांच्या या सडेतोड उत्तराने सर्व श्रोते अवाक झाले. यातून शिकण्यासारखे असे की आपण जे काही शिकतो त्यातील दुवे असे जोडणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट हवे. दुवे जोडण्याची ही विद्वत्ता हेच खरे शिक्षण आहे.*

*(हार्लन क्लिव्हलँड यांच्या लेखातून)*

# २ युरोचा वर्षाचा प्रवास

युरोपमधील अकरा राष्ट्रांनी स्वतःच्या वेगवेगळ्या चलनांचे विसर्जन करून 'युरो' या चलनाचा वापर करण्यास सुरूवात केली. त्याला आता एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला. 'युरो'च्या पहिल्या वाढदिवसानिमित्त (१ जानेवारी २०००) युरोपीय राष्ट्रांतील आर्थिक व राजकीय घडामोडींकडे हा एक थोडक्यात दृष्टिक्षेप.

ऑस्ट्रिया, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, इटली, लक्झेंबर्ग, स्पेन, पोर्तुगाल, बेल्जियम आणि आयर्लंड या राष्ट्रांनी 'युरो'च्या वापरास सुरूवात केली आहे. युरोच्या वापराला दहा महिने पूर्ण झाल्यावर युरोपमधील आर्थिक परिस्थितीचा आढावा 'द इकॉनॉमिस्ट' या नियतकालिकात घेण्यात आला. त्यावेळी असे आढळले की युरोपमधील शेअर बाजारात तेजीचे वातावरण आहे. तसेच चलनवाढ नियंत्रणात आहे. युरोपीय आर्थिक समुदायात सहभागी झालेल्या अकरा राष्ट्रांच्या सरकारांच्या मते, त्यांनी अपेक्षा केली होती त्यापेक्षा 'युरो'बाबतची प्रक्रिया फार सोपी ठरली. 'युरो'बाबतच्या कामकाजात मोठ्या अडचणी उदभवल्या नाहीत. अर्थात 'युरो'चा वापर सध्या चेक (धनादेश) व क्रेडिट कार्ड किंवा निधीचे हस्तांतर एवढ्यापुरताच मर्यादित आहे. 'युरो'च्या नोटा वा नाणी यांचा अद्याप प्रत्यक्षात वापर सुरू झालेला नाही. नाणी व नोटा १ जानेवारी २००२ रोजी वापरात आणण्याचे ठरविण्यात आले आहे.

अकरा राष्ट्रांचा आतापर्यंतचा युरोसंदर्भातील आर्थिक प्रवास उत्साहवर्धक आहे. त्यामुळे प्रत्येक देशात युरो व जुने चलन दोन्ही वापरात असेल असा सहा महिन्याचा कालावधी ठरविण्यात आला होता, तो सहा ते आठ आठवड्यांवर आणून युरोच्या वापराची गती वाढवावी असे संबंधित आर्थिक आयोगाने सुचविले आहे. बँका व दुकाने यांना, 'युरो' चलन (नाणी व नोटा) मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. फ्रान्समध्ये तर १ जानेवारी २००२ च्या आधीच नागरिकांना देखील 'युरो' चलन देण्यात येणार आहे.

'युरो'च्या जन्मानंतर पहिल्या सहा महिन्यांच्या काळात युरोचा विनिमयदर (Exchange Rate) हा काळजीचा विषय ठरला होता. पण आता अमेरिकन डॉलरच्या तुलनेत युरोचा दर बऱ्याच अंशी स्थिर झाला आहे. युरोमुळे आयात-निर्यातीत गोंधळ होईल असे वाटत होते. ती भीती आता फारच थोड्या प्रमाणात आहे किंवा जवळ जवळ नाहीच, अशी स्थिती

येण्याच्या मार्गावर आहे असे अर्थतज्ज्ञ म्हणतात. युरोपीय आर्थिक समुदायाची मान्यता असलेल्या 'युरोपियन सेंट्रल बँके'चे कामकाज काही अपवाद वगळता, चांगले सुरू आहे. त्यामुळे आता 'युरो' चलन आपल्या देशात मान्य न करणारी ब्रिटन, डेन्मार्क, स्वीडन ही राष्ट्रेही युरोबाबत सकारात्मक विचार करू लागली आहेत.

ग्रीसला युरोपीय आर्थिक समुदायात सहभागी होण्यात प्रथमपासून रस होता. पण त्यावेळी काही आर्थिक कारणांमुळे ग्रीसला सहभागी होता आले नाही. आता २००१ च्या जानेवारी महिन्यापर्यंत 'युरो'त सहभागी होण्याचा ग्रीसच्या सरकारचा प्रयत्न आहे.

युरोपीय आर्थिक समुदायात सहभागी न होण्याचे स्वीडनने प्रथम ठरविले होते. पण तेथील जनमत आता युरोच्या बाजूने विचार करू लागले आहे. तेथील सत्तारूढ 'सोशल डेमोक्रॅट्स' तर्फे आता येत्या मार्च महिन्यात यासंबंधी विशेष चर्चा आयोजित करण्यात आली आहे. ही चर्चा यशस्वी झाली तर ऑक्टोबरच्या सुमारास तेथेही सार्वमत घेण्यात येण्याची शक्यता आहे. युरोच्या बाजूने सार्वमत असले तर २००१ च्या सुरुवातीस स्वीडनमध्येही 'युरो' चलन अस्तित्त्वात येईल.

डेन्मार्कने मास्ट्रिच करारानंतर युरोपीय आर्थिक समुदायाबाहेर राहण्याचा पर्याय स्विकारला असला तरी सध्याचे डेन्मार्कचे पंतप्रधान, पोल नायरप रासमुसेन हे युरोपीय आर्थिक समुदायात सहभागी होण्याच्या बाजूचे आहेत. डेन्मार्कचे सेंट्रल बँकेचे गव्हर्नर, बोडिल अँडरसन आणि 'कॉन्फेडरेशन ऑफ डॅनिश इंडस्ट्री' यांचा पाठिंबा पंतप्रधानांना आहे. डेन्मार्कमध्ये नुकत्याच झालेल्या जनमत चाचणीत नागरिकांनीही युरोच्या बाजूने कौल दिला आहे. त्यामुळे डेन्मार्कमध्ये मार्च २००२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी 'युरो'बाबत निर्णय घेण्याचा पंतप्रधानांचा विचार आहे.

गेल्या वर्षभरातील युरोपमधील आर्थिक आढावा पाहता, ब्रिटन वगळता इतर सर्वांनी 'युरो' ही एक वस्तुस्थिती असल्याचे तत्त्वतः मान्य केले आहे. युरोला पाठिंबा देऊन आपले व्यापारविषयक अनेक प्रश्न सुटू शकतात असे या देशांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे ब्रिटनच्या सरकारवर 'युरो'त सहभागी होण्याबाबतचा दबाव कायम असणार आहे. ब्रिटनचे सध्याचे पंतप्रधान टोनी ब्लेअर हे युरोचे समर्थक आहेतच. मात्र नागरिकांचा पाठिंबा नसल्याने ते हा निर्णय घेऊ शकत नाहीत. येत्या दोन-तीन वर्षातच ब्रिटनमधील नागरिकही युरोच्या बाजूने कौल देतील अशी शक्यता आहे.

■■

# ३ स्वातंत्र्य आणि समानता

सरत्या शतकाची पाने मिटताना आणि नव्या शतकाचे स्वागत करताना कळत नकळत अनुभवांची व अपेक्षांची मोजपट्टी प्रत्येकाच्या मनात आकार घेत असते. या अनुभवांच्या व अपेक्षांच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष जीवन जगले जात असते. अशा वेळी काही घटना, अनुभव काळाशी सुसंगत ठरत नाहीत, स्वाभाविकच ते मागे पडतात. पण कधी कधी अशा घटनांमागील वैचारिक तत्त्व मात्र कुठेतरी जिवंत असते. 'स्वातंत्र्य' आणि 'समानता' ही सरत्या शतकातील तत्त्वे अशीच नव्या शतकात जिवंत राहणार आहेत. मात्र या तत्त्वांसाठी झालेले संघर्ष विस्मृतीच्या काळात जाऊ शकतात.

वरवर पाहता अतिशय साधे व अर्थपूर्ण वाटणारे हे शब्द इतिहास घडवू शकतात. अनेक राष्ट्रात, अनेक समाजात, स्वातंत्र्य आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी बरेचदा संघर्ष झाले. या संघर्षात अनेकांचे बळी गेले. तरी अद्याप स्वातंत्र्य म्हणजे नक्की काय, हा प्रश्न कायम आहे. स्वातंत्र्य आणि समानता ही मूलतत्त्वे एकाच वेळी उपभोगता येत नाहीत. किंबहुना या शब्दांमध्येच एक अंतर्विरोध आहे, म्हणूनच जगात सतत संघर्ष सुरूच राहणार आहे आणि स्वातंत्र्य म्हणजे काय, याचे चर्वितचर्वण होत राहणार आहे. एकविसाव्या सहस्त्रकाकडे वाटचाल करताना आणि जागतिकीकरण, बाजाराभिमुख अर्थव्यवस्था, पर्यावरण, गरिबीचे उच्चाटन, अल्पसंख्यांकांचे हक्क, स्त्रियांची सामाजिक स्थिती अशा प्रकारच्या प्रश्नांना सामोरे जाताना स्वातंत्र्य आणि समानता हीच तत्वे किंवा याबाबतचा संभ्रम या सर्व प्रश्नांच्या मुळाशी आहे हे समजून घेतले पाहिजे.

समानता प्रस्थापित करायची झाल्यास बहुतेकवेळा कुठेतरी, कुणाच्या तरी स्वातंत्र्यावर गदा येते. अगदी सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्यावरूनही हा प्रश्न निर्माण होऊ शकतो. सरत्या शतकात मात्र काही प्रश्नांबाबत नागरिकांनी स्वतःहून आपल्या स्वातंत्र्याचा संकोच करून समानता प्रस्थापित करण्याच्या घटना घडल्या आहेत. उदाहरणार्थ, शिक्षणाबाबतची असमानता किंवा नोकऱ्यांमधील वंश व लिंगभेदांमुळे निर्माण होणारी असमानता मोडून काढण्यासाठी समाजाने आपल्या स्वातंत्र्यावरील बंधने मान्य केली. त्यामुळे समानतेसाठी मोठा दबाव किंवा बडगा असायलाच हवा असे नाही, असे वरील उदाहरणांवरून लक्षात येते. साम्यवाद व समाजवाद यातून स्वातंत्र्य उपभोगण्याआधी माणसाची मानसिक जडण-घडण एका

ठराविक दिशेने होणे याला महत्त्व दिलेले आढळते. चीन व रशिया येथे आता हा विचार कालबाह्य होत असला तरी समानतेसाठी स्वातंत्र्याचा संकोच करण्याचे हेच सूत्र लोकशाही राष्ट्रांमध्येही अवलंबिले जाते असे आढळते. कोणत्याही राष्ट्रातील सरकार जेव्हा नागरिकांचे हित जपण्यासाठी, नागरिकांना एक गोष्ट सोडून दुसरी गोष्ट करण्यासाठी भाग पाडते, तेव्हा ते सरकार 'मर्यादित स्वातंत्र्य' याच संकल्पनेला व्यवहारात उतरवीत असते. पाश्चात्त्य देशांत वर्णभेदाचा, वंशभेदाचा लढा सुरू असताना (साधारपणे १९३० च्या सुमारास) आणि समाजात आर्थिक समानता प्रस्थापित व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असताना (म्हणजे १९४५ च्या सुमारास) व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा घातल्या होत्या. आता हे विषय मागे पडले असले तरी यांमागील शक्ती वा दबावगट अजूनही कार्यरत आहेत.

भारतातही या दोन विषयांवरून गोंधळाचे वातावरण आहे. समानता आणण्याच्या उद्दिष्टाने विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या सरकारने केलेला मंडल आयोगाचा प्रयोग व त्यावरून झालेला हिंसाचार हे काही वर्षांपूर्वीचे एक उदाहरण झाले. सध्याच्या काळातही स्त्रियांना राखीव जागा देण्याच्या प्रश्नावर वैचारिक गोंधळ आहे. या समानतेमुळे पुरुषांचे स्वातंत्र्य मर्यादित होणार, ही भीती पुरुषांकडूनच व्यक्त करण्यात येत आहे. सामाजिक प्रश्नांना थोडे बाजूला ठेवून आर्थिक प्रश्नांचा विचार केला तर असे आढळते की खुल्या व बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला तर जागतिक पातळीवर राष्ट्रा-राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेत समानता येईल का? ती अर्थव्यवस्थेतील समानता भारतात राहील का? बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे की मर्यादित स्वातंत्र्य द्यावे, भारतीय कंपन्या व परदेशी कंपन्या यांना समान समजायचे का? यावरूनही हाच गोंधळ कायम आहे.

आर्थिक बाबींना महत्त्व देताना त्यांच्या आड येणाऱ्या मानवी दृष्टिकोणाला बाजूला सारणे ही एक मोठी चूक जगात अनेकांकडून होत आहे. पर्यावरणाचे गंभीर प्रश्न यातूनच निर्माण होत आहेत. म्हणूनच मोठ्या धरणांविरूद्ध आंदोलने होत आहेत. मोठे रासायनिक, औद्योगिक व वीजनिर्मिती प्रकल्प उभारताना होणारी नैसर्गिक साधनसामग्रीची हानी याच मानवी दृष्टिकोणातून महत्त्वाची ठरते. अमर्यादित आर्थिक सत्ता व स्वातंत्र्य यांचा मेळ मानवी दृष्टिकोणाशी घालणे महत्त्वाचे आहे असा विचार आता पुढे येत आहे. त्यातूनच संपूर्ण जगात भांडवलशाही आपले हातपाय पसरत असतानाच भांडवलशाहीतील त्रुटीही लक्षात येत आहेत. एकविसाव्या सहस्त्रकात प्रवेश करताना मावळत्या सहस्त्रकातील स्वातंत्र्य व समानता या

मूलतत्वांच्या जोडीला मानवी दृष्टिकोण असणे किती आवश्यक आहे याचा विचार होणे गरजेचे आहे.

विशेषतः मुक्त जागतिक व्यापार आणि खुली अर्थव्यवस्था या नव्या आर्थिक धोरणांतील दोन महत्त्वाच्या बाबी असल्या तरी यासंबंधात होणारा वाद शेवटी स्वातंत्र्य आणि समानता याच मुद्यांपाशी येऊन थांबतो. व्यापाराशी संबंधित सर्वच घटकांचे स्वातंत्र्य जपायचे असे ठरविले तर त्यातून असमानताच निर्माण होते, असे आढळल्यानेच जागतिक व्यापार संघटनेच्या परिषदेला अमेरिकेतील अनेक संघटनांनी विरोध केला. आज अमेरिकेतदेखील जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तेथील उद्योजकांना उच्च तंत्रज्ञान जाणणाऱ्या कर्मचाऱ्यांची गरज आहे. यासाठी परदेशातून कर्मचारी आणण्याची परवानगी उद्योजकांच्या संघटनेने सरकारकडे मागितली आहे. पण कामगार संघटनांनी त्याला जोरदार विरोध केला आहे. आता कोणाचे स्वातंत्र्य सरकारने जपायचे? स्वातंत्र्य आणि समानतेचा मुद्दा उपस्थित होतो तो असा!

(द इकॉनॉमिस्ट ११ सप्टेंबर ९९ मधील लेखाच्या आधारे)

■■

### *शरीराचे शिक्षण व मनाचे शिक्षण*

*मला असे वाटते की, आपल्या शिक्षणपद्धतीत प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्या ना कोणत्या तरी हस्तव्यवसायांत शक्य तोवर चांगले कुशल बनविले पाहिजे. याचा मुख्य उद्देश केवळ औद्योगिक शिक्षण नव्हे. खरी गोष्ट अशी आहे की, असल्या एखाद्या शारीरिक कलेच्या शिक्षणाने मनुष्याचे शरीर सजीव आणि सतेज बनते. ज्या विद्यार्थ्यांना आपण बुद्धिहीन अथवा जड बुद्धीचे समजतो त्यांची सुप्त असलेली बुद्धिशक्ती बहुधा या शरीराच्या अथवा हस्तव्यवसायाच्या शिक्षणाने जागृत होते. शरीराचे अशिक्षण मनाच्या शिक्षणाचे सामर्थ्य हिरावून घेते. याशिवाय ज्याला शरीराचे शिक्षण मिळालेले नाही तो केवढाही पंडित झाला तरी त्याला जगांतील पुष्कळशा बाबतींत दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. तो अपूर्ण मनुष्य होय. आपण आपल्या बालकांना या अपूर्णतेपासून वाचविले पाहिजे. यांत आपणाला कित्येक संशयात्म्यांकडून विरोध अवश्य होईल. पण या विरोधाकडे लक्ष देणे योग्य नाही.माझा असा दृढ विश्वास आहे की, शरीराच्या शिक्षणाशीं मनाच्या शिक्षणाचा आणि शरीराच्या कार्यप्रवणतेशी मनाच्या कार्यप्रवणतेचा गाढ संबंध आहे. या दोहोंमध्ये चांगला मेळ राहिला नाही तर आपल्या जीवनाचा छंद देखील तुटून जातो*

*(रवीन्द्रनाथ ठाकुर)*

# ४ लोकशाहीतील नागरिकांचे समाधान

माणसाचे आर्थिक आणि एकूणच जीवन अधिक समाधानी, अधिक आनंदी कशाने होते याची काहीएक मांडणी सैद्धांतिक अर्थशास्त्रात केली गेली आहे. अर्थशास्त्र असे मानते की माणसे बुद्धिनिष्ठतेने विचार करतात. आणि आपल्याला अधिक समाधान (अर्थशास्त्राची संज्ञा आहे 'उपयोगिता'.) देणाऱ्या वस्तूंची नेहमी निवड करतात. आणि नेहमीच याप्रकारे वागून जास्तीत जास्त उपयोगिता मिळविण्याचा प्रयत्न करतात; आपले भौतिक समाधान कमाल करण्याचा प्रयत्न करतात. अर्थात याच्यासाठी त्यांच्या हाती असलेले साधन 'पैसा' हे असते. त्यामुळे अधिकाधिक-पैसा मिळवावा, त्यातून अधिकाधिक खरेदी करावी आणि त्याकरवी अधिक उपयोगिता मिळवून आपले समाधान, आपला आनंद वाढवीत जावा, अशा वृत्तीने व अशा पद्धतीने माणसे जगतात असे मानले गेले आहे.

परंतु समाधानाच्या किंवा आनंदाच्या बाबतीतल्या या शास्त्रीय समजुतीला धक्का देणारे काही निष्कर्ष आता प्रत्यक्ष आर्थिक-सामाजिक अभ्यासांतून पुढे येत आहेत. हे अभ्यास असे सांगतात की, वाढता पैसा लोकांना आनंदी करीत नाही तर त्यांचे जीवनातले आनंद इतर अनेक गोष्टींवर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, रोजगार किंवा नोकरी हा एक असा घटक आहे. रोजगाराचे साधन असणारे लोक बेकार असणाऱ्यांपेक्षा अधिक समाधानी असतात. जेव्हा 'अजिबात समाधानी नाही' (शून्य समाधान) इथपासून ते 'पूर्ण समाधानी' (१०० टक्के समाधानी) अशाप्रकारे संख्यात्मक भाषेत मांडणी केली तेव्हा असे आढळून आले की रोजगार असल्यामुळे पूर्ण समाधानी होण्याची शक्यता २६ टक्क्यांनी वाढते. उत्पन्नवाढीचा परिणाम एवढा मोठा नसतो.

माणसाचे समाधान वाढवणारे इतर घटक कोणते? कमी भाववाढ हा असाच एक घटक आहे. विवाहित लोक अविवाहितांपेक्षा आणि मूल-बाळ नसलेले मुले असलेल्यांपेक्षा अधिक समाधानी असतात. तर स्त्रिया या पुरुषांपेक्षा अधिक समाधानी असतात. सुशिक्षित लोक अशिक्षितांपेक्षा अधिक समाधान प्राप्त करू शकतात; तर रोजगारातही, नोकरदारांपेक्षा स्वयंरोजगारातील लोक समाधान अधिक मिळवतात. आणि सेवानिवृत्त मंडळी नोकरीत असणाऱ्यांपेक्षा जास्त समाधानी असतात. एक गमतीदार निष्कर्ष

असा आहे की, वयोमानानुसार पाहिले तर, आपण वयाच्या तिशीत जाईपर्यंत समाधानाची पातळी खाली जाते. परंतु नंतर मात्र ती वाढत जाते.

आपले समाधान, सामाजिक आणि राजकीय घटकांवरही अवलंबून असते. याविषयीचा एक अभ्यास झुरीच विद्यापीठातील ब्रुनो फ्रे आणि अलोई स्टटझर यांनी केला. अर्थात हा अभ्यास स्वित्झर्लंडमधील आहे. परंतु त्याचे निष्कर्ष आपल्याकडेही लागू पडतील असे वाटते. या अभ्यासात इतर घटकांबरोबर लोकशाहीसंबंधित काही घटकही विचारात घेतले होते. पाहणीतून असे आढळले की लोकशाहीतील राजकीय संबंध हे मोठ्या प्रमाणावर लोकांच्या समाधानाशी निगडीत असतात. म्हणजे असे की लोकशाहीत लोकांना प्रत्यक्ष सहभाग जेवढा मिळेल तेवढे त्यांचे समाधान वाढत जाते. त्यातही शासनाचे चांगले निर्णय जी काही समाधानात भर घालतात त्याहीपेक्षा जास्त समाधान लोकांना त्या निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्यातून आणि त्यात पुढाकार घेण्यातून प्राप्त होत असते.

आपल्या देशात प्रातिनिधिक लोकशाही आहे. आणि शासकीय निर्णयात लोकांचा प्रत्यक्ष सहभाग फारसा नसतो. निदान समाजावर प्रभाव पाडणाऱ्या काही महत्त्वाच्या निर्णयांबाबत चर्चा, पुढाकार यांची संधी प्राप्त झाली; तीही निर्णय घेण्यापूर्वी मिळाली तर सर्वसामान्यपणे लोकांच्या समाधानाची पातळी वाढू शकेल. तशी व्यवस्था व्हावी अशी मागणीही लोकांना करता येईल. कारण, राज्यकर्ते जे काही निर्णय घेतात त्यांवर आपले नियंत्रण आहे असे नागरिकांना वाटणे, आणि त्यातही त्या प्रक्रियेमध्ये पूर्णतः सहभागी व्हायला मिळणे यावर नागरिकांचे समाधान मोठ्या अंशाने अवलंबून असते; असे संशोधनाचे दाखले आहेत.

('द इकॉनॉमिस्ट' १७ एप्रिल ९९ मधील लेखाच्या आधारे.)

■■

*भावनात्मक सामर्थ्य*

*मनुष्याच्या संपूर्ण विकासाची आपल्याला कळकळ आहे म्हणून आपण त्याच्या भावनांचा ऊर्मी समजून घेतल्या पाहिजेत. त्या ऊर्मी बौद्धिक तर्कापेक्षा पुष्कळच जास्त जोरदार असतात. आपण भावनात्मक सामर्थ्य दडपून टाकण्यास साहाय्य न करता ते विकसीत करण्यास साहाय्य केले पाहिजे. जेव्हा हे भावनात्मक व बौद्धिक प्रश्न आकलन करून ते हाताळण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी येईल तेव्हा त्या प्रश्नांना तोंड देताना भीती वाटणार नाही.*

*(जे. कृष्णमूर्ती यांच्या 'भावी जीवन' या पुस्तकातून)*

# ५ लोकशाही आणि दबावगट

लोकशाहीत लोकांच्या मतांना प्राधान्य दिले जावे हे गृहिततत्त्व आहे. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी शासनाचा कारभार करताना लोकशाही तत्त्वांना अनुसरून काम करणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधींवर जनमताचा अंकुश गरजेचा असतो, या जाणीवेतून अनेक व्यक्ती वा संस्था एकत्र येऊन आपल्या जनमताचा प्रभाव वाढवीत असतात, संघटित शक्ती उभी करीत असतात. अनेकदा या संघटित शक्तीचे राजकीय प्रक्रियेत 'दबावगट' म्हणून रूपांतर होते. असे वेगवेगळे दबावगट निर्माण होणे हे परिपक्व लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे.

जगात बहुतेक सर्वच लोकशाही राष्ट्रांमध्ये असे विविध दबावगट कार्यरत आहेत. अशा दबावगटांमुळे नागरिकांचा लोकशाही निर्णयप्रक्रियेतील सहभाग अप्रत्यक्षपणे वाढतो, ही नागरिकांसाठी समाधानाची बाब असते. पण हे दबावगट ही राजकर्त्यांसाठी आता डोकेदुखी ठरत आहे. अशा विविध दबावगटांमुळे कोणताही निर्णय घेता येत नाही अशी स्थिती परदेशात विशेषतः अमेरिकेत आली असल्याचा एक मतप्रवाह आहे.

दबावगटांवर टीका करणाऱ्यांना आवडेल असा एक ग्रंथ आहे, "द लॉजिक ऑफ कलेक्टिव्ह अॅक्शन". अमेरिकेतील अर्थतज्ज्ञ मॅकर ओलसन यांनी लिहिलेले हे एक छोटेखानी पुस्तक. लोकशाहीचे आरोग्य अशा विविध दबावगटांमुळे चांगले राहते, दबावगटांमध्ये आपापसात स्पर्धा असते, दबावगटांमध्ये होणाऱ्या वादानंतर सरकारचे काम हे पंचाप्रमाणे असते, म्हणजे सरकारचे धोरण योग्य त्या दिशेने वळण घेते. दबावगटांबाबतचा हा पूर्वीपासून चालत आलेला दृष्टिकोण ओलसन यांना मान्य नाही. ते म्हणतात की विविध दबावगट समान असतातच असे नाही. यासाठी ते उदाहरण देतात की समजा मोटार तयार करणाऱ्या पाच कंपन्या आहेत. त्यांनी गट करून जर मोटारींच्या किंमती सरकारकडून वाढवून घेतल्या तर प्रत्येक कंपनीचा फायदा होईल, पण लाखो मोटारधारक अडचणीत येतील. कारण अशा मोटारधारकांना एकत्र आणणे अवघड आहे. [हे उदाहरण अमेरिकेतच लागू होईल कारण तिथे मोटारी सतत बदलणे (जुनी काढून नवीन घेणे) ही नित्याची बाब आहे, हे लक्षात घेणे महत्त्वाचे.]

राष्ट्राची प्रगती किंवा अधोगती दबावगटांमुळेही होऊ शकते असे ओलसन म्हणतात. (यासाठी ते जर्मनी व जपानचे उदाहरण देतात. दुसऱ्या

महायुद्धानंतर जर्मनी व जपानने ब्रिटनच्या तुलनेत दबावगटांना दूर केले म्हणूनच त्यांची प्रगती झाली असे त्यांचे म्हणणे आहे!) दबावगटांच्या वर्चस्वामुळे ब्रिटनला परिस्थितीप्रमाणे बदलून नवनवीन तंत्रज्ञानाचे मार्ग चोखाळता आले नाहीत, असे ते म्हणतात. अमेरिकेत सध्या अशा दबावगटांचे इतके प्रस्थ आहे की दर दहापैकी सात अमेरिकन कुठल्यातरी संस्थेशी संबंधित असतात. संपूर्ण समाजव्यवस्था दबावगट तयार करण्यात गुंतली असल्याचे, जोनाथन रॉच या लेखकाने म्हटले आहे. त्यामुळे निवडून आलेले प्रतिनिधी जनहितार्थ योग्य निर्णय घेऊच शकत नाहीत, असे आढळते.

अमेरिकेचे अध्यक्ष क्लिंटन यांना आरोग्य सेवेत काही सुधारणा करायच्या होत्या. पण आरोग्यविषयक विमा उद्योगाने त्यांना त्या करू दिल्या नाहीत. अलीकडेच झालेल्या जागतिक व्यापार परिषदेच्या निमित्ताने तर अमेरिकेच्या सरकारवर असणाऱ्या दबावगटांचा पगडा जगाच्या उघडकीस आला. जागतिक व्यापार संघटनेत चीनचा प्रवेश हा अमेरिकेच्या ग्राहकांसाठी उपयुक्त ठरु शकेल, पण अमेरिकेतील कापड उद्योजक व स्टील उद्योजक यांनी दबाव आणून अध्यक्षांचे पाय मागे खेचले. सिएटल येथील जागतिक व्यापार परिषदेच्या वेळी अमेरिकेतील कामगार संघटना, पर्यावरणवादी संघटना अध्यक्षांवर दबाव आणत होत्याच. अमेरिकेत अध्यक्षांवर दबाव आणणाऱ्या, प्रशासकीय अधिकाऱ्यांवर दबाव आणणाऱ्या, काँग्रेसवर दबाव आणणाऱ्या आणि न्यायालये व स्थानिक प्रशासन यांच्यावर दबाव आणणाऱ्या अशा अनेक दबावगटांचे पेव फुटले आहे. ज्या राष्ट्रांमध्ये ज्या निर्णय घेणाऱ्या गटांवर दबाव आणता येईल तिथे तो आणण्याचा प्रयत्न दबावगट करीत असतातच. त्यामुळे या ना त्या मार्गाने त्यांचे उद्दिष्ट पूर्ण होत असते.

जर्मनीमध्ये अशा दबावगटांना कार्यालयीन कामकाजाच्या पद्धतीने दर्जा देण्यात येतो. तसेच प्रशासकीय किंवा राजकीय गटाला काही नवीन बदल करायचे असतील तर अशा अधिकृत दर्जा मिळालेल्या दबावगटांशी चर्चा करण्याचे कायदेशीर बंधन पाळावे लागते. विविध संस्था, समित्या, निदेशक मंडळे यात दबावगटांसाठी काही जागा राखून ठेवण्यात येतात.

फ्रान्समध्येही दबावगटांना भरपूर महत्त्व देण्यात येते. असे दबावगट निधीसाठी किंवा समित्यांवर नियुक्ती व्हावी यासाठी सरकारवर अवलंबून असले तरी सरकारवरील त्यांचा दबाव कायम असतो. फ्रान्समध्ये निदर्शने, संप, रस्तेबंद, सार्वजनिक सेवांमध्ये व्यत्यय या सर्व बाबींना लोकशाहीचाच एक भाग समजण्यात येते त्यामुळे दबावगटांच्या या साधनांवर गदा येत नाही. जपानमध्ये देखील शेतकऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनेने अनेक निर्णय

घेताना राज्यकर्त्यांवर दबाव आणला आहे. या संघटनेचा दबाव इतका जास्त आहे की शेतकऱ्यांचे नुकसान होईल असा कोणताही निर्णय सरकार घेऊ शकत नाही. शैक्षणिक क्षेत्रातही तेथे शिक्षकांचा दबावगट कार्यक्षम आहे. अशा प्रकारे जपानमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील दबावगटांचे महत्त्व फार आहे. एखाद्या विशिष्ट उद्योगाशी संबंधित असलेल्या लोकप्रतिनिधीला जपानच्या संसदेत 'डाएट' मध्ये महत्त्व आहे. या प्रकाराला 'आयर्न ट्रँगल' समजले जाते. यात राजकीय पक्षांचे नेते, प्रशासकीय अधिकारी व औद्योगिक दबावगट यांचा समावेश असतो. युरोपियन देशांमध्येही दबावगटांचे महत्त्व आहे. १९९२ मध्ये युरोपियन समुदायात सहभागी असलेल्या राष्ट्रांमधील एकूण दबावगट सुमारे तीनहजार होते आणि त्यात काम करणाऱ्यांत सुमारे दहाहजारावर नागरिकांचा समावेश होता.

वरील उदाहरणे लक्षात घेऊन, दबावगट नकोत अशी भूमिका घेतली तर तेही बरोबर ठरणार नाही. दबावगट वाईटच असतात असे नाही. दबावगटांमुळे नागरिकांना राजकीय पक्षांवर अंकुश ठेवता येतो, केंद्रीय सत्ता अनिर्बंध राहत नाही, जनहिताचे निर्णय घेण्यासाठी सरकारला जागरूक राहावे लागते, दबावगटातील व्यक्तींचा त्या त्या विषयाचा अभ्यास सखोल असू शकतो त्यामुळे सरकारला योग्य सल्ला मिळू शकतो, एकाच विषयावरचे अनेक दबावगट उभे राहून त्यांच्यात वाद-चर्चा होऊन त्या विषयाच्या सर्वंकष अभ्यासानंतरच निरनिराळ्या शिफारसी सरकारला करण्यात येतात, असे अनेक फायदे दबावगटांचे समर्थक सांगत असतात. खरे तर राज्यकर्त्यांना नेहमीच अशा दबावगटांचा चांगला उपयोग झाल्याचे आढळते, शिवाय नागरिकांचे, जनसामान्यांचे मत समजून निर्णय घेणे ही प्रक्रिया सोपी होते. त्यामुळे वैचारिक संघर्ष टाळता येऊ शकतो.

दबावगटाच्या राजकारणाचा हा थोडक्यात घेतलेला आंतरराष्ट्रीय आढावा असला तरी भारतातही दबावगट आहेत हे आपण जाणतोच. महाराष्ट्रातील शुगर लॉबीचा दबावगट, स्वदेशी उद्योजकांचा दबावगट, वेगवेगळ्या कर्मचाऱ्यांच्या संघटना व त्यांचे दबावगट ही काही उदाहरणे. याशिवाय पर्यावरण समर्थकांचा दबावगट, स्त्रियांच्या हक्कासाठी दबावगट असे नवीन काही दबावगट तयार झाले आहेत. भारतातील एकूण राजकारणाची, समाजकारणाची सद्यस्थिती पाहता येथे जागरूक नागरिकांचे दबावगट हवेतच, असे विधान करणे धाडसाचे ठरणार नाही. लोकशाहीत, लोकांनी, लोकांच्या मताला प्राधान्य मिळावे म्हणू दबावगट तयार करणे हे लोकशाहीच्या परिपक्वतेचे लक्षण ठरेल. आज भारतात अनेक क्षेत्रांसाठी

दबावगटांची आवश्यकता आहे. विशेषतः जिथे, उद्याचा नागरिक घडतो अशा शिक्षणक्षेत्रातील सावळा गोंधळ दबावगटांच्या माध्यमातून वेळीच आवरला गेला नाही तर मात्र देशाची दुर्दशा बघविणार नाही. अगदी प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठाच्या शिक्षणापर्यंत वेगवेगळ्या पातळ्यांवर मूल्यशिक्षणासाठी आग्रह धरणारे दबावगट तयार व्हायला हवेत.

याशिवाय सध्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या दबावगटांमध्येही समन्वय हवा. म्हणजे जनहिताचे निर्णय घेताना सरकार गोंधळणार नाही. एका गटाचे म्हणणे ऐकून दुसऱ्या गटाचे नुकसान करायचे असे व्हायला नको. आपल्या देशात दबावगटांचे महत्त्व वाढत असताना अमेरिकेसह काही पाश्चिमात्य राष्ट्रांत 'दबावगट नको' म्हणणाऱ्यांचा एक दबावगट उभा राहतो आहे व असाच दबावगट भविष्यात भारतातही तयार होऊ शकतो, याची जाणीव ठेवलेली बरी.

(संदर्भ - 'द इकॉनॉमिस्ट' २१ ऑगस्ट १९९९)

■■

## *शिक्षण व जीवनाचे प्रयोजन*

*ज्या लोकांना कधीही 'शिक्षण' मिळालेले नसते पण जे जीवन-व्यवहारात जागरूक राहून आपल्या ज्ञानाची आणि आपल्या कार्यकौशल्याची वृद्धी करीत असतात, अशा लोकांमध्ये एक प्रकारची स्फूर्ती, प्रत्युत्पन्न बुद्धी आणि आत्मविश्वास आढळून येतो. याचे कारण असे आहे की, ते केवळ ज्ञानाच्या पाठीमागे लागलेले नसतात. त्यांना केवळ जगावयाचे असते. खाणे, पिणे, निरोगी राहणे, वस्तुमात्राचे आकलन करून घेऊन त्यापासून लाभ मिळविणे, आपली कर्तृत्वशक्ती वाढविणे, अंतःकरणापासून प्रेम करणे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून जीवन समृद्ध करणे हेच त्यांच्या जीवनाचे प्रयोजन असते.*

*त्यांच्याशी तुलना करिता, जे लोक केवळ धनसंग्रह वाढविण्याची इच्छा बाळगितात, केवळ साधन-संपत्तीचा ढीग जमवू बघतात, ज्ञानाचा भार वाढवून त्याच्याखाली स्वतःला दडपून घेऊ इच्छितात, त्यांचे जीवन खरोखर असमर्थ आणि अनुकंपनीय होऊन जाते.*

***आचार्य काकासाहेब कालेलकर***

# ६ बुद्धिमत्तांचा शोध घेते ते शिक्षण!

सामाजिक-आर्थिक बदलांचे एक साधन म्हणून आपण 'शिक्षणा'चे महत्त्व फार पूर्वीपासून हेरले आहे. त्यासाठी 'शाळा' नामक संस्थाही विकसित केली आहे. शाळांकरवी शिक्षण आणि या शिक्षणातून 'स्वतःचे व्यक्तिमत्त्व असलेली एक सामाजिक व्यक्ती' आपण घडवू पाहत असतो. म्हणजे असे की, शिक्षणाची दोन उद्दिष्टे आपल्या डोळ्यासमोर असतात. एक, व्यक्तीला तिच्या स्वतःच्या उपजत गुणांनुसार घडण्यास, पुढे जाण्यास वाव देणे; आणि दोन, व्यक्तीला, एक सामाजिक घटक म्हणून आपले आयुष्य व्यतित करायचे असल्यामुळे समाजाच्या गरजांनुसार 'सामाजिक व्यक्तिमत्त्व' घडविणे. समाजात मिळून मिसळून जगता यावे यादृष्टीने त्याच्या विचारांना व वागणुकीला वळण देणे. शिक्षणातून हे सारे घडावे अशी आपली अपेक्षा असते.

ही अपेक्षा पुरी व्हायची असेल तर, समाजातील सर्वच घटकांना शिक्षणाची संधी मिळावी लागेल. सर्वांनाच शिक्षणाची समान संधी मिळावी लागेल. शिक्षण सार्वत्रिक व्हावे लागेल. वर दिलेली उद्दिष्टे काही किमान पातळीवर पुरी व्हावयाची असतील तर, सर्वांनाच निदान प्राथमिक शिक्षणाची तरी पुरेशी संधी उपलब्ध व्हायला हवी. प्रत्येकाच्या बाबतीत चौदा वयापर्यंत म्हणजे, आपल्या शैक्षणिक परिभाषेत सातवी-आठवी इयत्तेपर्यंतचे शिक्षण सर्वांनाच उपलब्ध झाले पाहिजे. आज, प्राथमिक शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क मानावा व तो अंमलात आणण्यासाठी सगळीकडे मोफत, सक्तीच्या शिक्षणाची तजवीज करावी असा जो आग्रह धरला जात आहे; त्याचे कारणही हेच आहे.

भारताच्या स्वातंत्र्याला आणि प्रजासत्ताकालाही अर्धशतकाचा कालावधी होऊन गेला. परंतु प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट गाठण्याच्या बाबतीत आपण अजूनही पुरेशी वाटचाल करू शकलो नाही. याची अनेक आर्थिक व सामाजिक स्वरूपाची कारणे दिली जातात. अलीकडच्या काही अभ्यासांमधून अनेक मुलांच्या शिक्षणात अडथळा आणणारी काही 'शिक्षणविषयक' कारणेही पुढे आलेली आहेत. भारतातील असंख्य खेड्या-पाड्यांतून, एकतर मुले शाळेत जातच नाहीत किंवा दामटून शाळेत नेऊन बसवलीच तर ती तिथे फार काळ टिकतच नाहीत. आणि याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्या लाखो शाळांमधील असलेले, अनुत्साही, गचाळ, भीतीचे वातावरण. त्यामुळे लहान मुलांना शाळेची आवड निर्माण

होण्याऐवजी सुरूवातीपासून नावडच निर्माण होते आणि मग मुले शाळेत टिकतच नाहीत; आणि शिकतही नाहीत.

बऱ्याच मुलांना शाळेतील पठडीबद्ध शिक्षण, पाठांतर, परीक्षा या वातावरणाची उपजत नावडच असते. मारून मुटकून त्यांना अभ्यासाला लावले तरी ती फारशी प्रगती करीत नाहीत. मग शिक्षक त्यांना 'ढ' म्हणून शिक्का मारतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांना नाउमेद करतात. बरोबरीच्या तथाकथित 'हुशार' मुलांचे उदाहरण देऊन अवमानित करतात. यातून अशा मुलांचा मनोभंग होतो आणि मग शाळेने 'अपयशी' ठरविलेली ही मुले न्यूनगंड घेऊन जगतात. यांपैकी काही मुले मात्र आयुष्यात वेगळ्याच क्षेत्रात यशस्वी होतात. नाव कमवतात. जीवनात वेगवेगळ्या क्षेत्रांत यशस्वी झालेल्यांचा शालेय इतिहास न्याहाळला तर असेही दिसून येते की यांपैकी बहुतेक मुले शालेय पठडीबद्ध शिक्षणात फारशी यशस्वी ठरलेली नसतात. असे का होते ? शाळेतील परीक्षांत चांगले मार्क मिळवून हुशार ठरलेली मुले पुढील आयुष्यात त्याच स्तरावरचे यश का मिळवीत नाहीत ? शाळेत 'ढ' ठरविलेली मुले जीवनाच्या वेगळ्याच क्षेत्रात नाव कसे कमावतात ? थोडक्यात असे की, शाळेतील 'हुशार' आणि 'ढ' यांची वर्गवारी व्यापक जीवनाच्या पातळीवर टिकून का राहत नाही ?

या प्रश्नांची उत्तरे आता मिळू लागली आहेत. अलीकडे मानवी मेंदूच्या संदर्भातील संशोधन पुढे गेले आहे. त्यातून मानवी 'बुद्धिमत्ते'च्या संदर्भातील काही नवे संशोधन, नवे निष्कर्ष पुढे येऊ लागले आहेत.

आपण आजपर्यंत ज्याला 'बुद्धिमत्ता' म्हणून संबोधत आहोत, तो मानवाला निसर्गतःच प्राप्त झालेल्या अनेक प्रकारच्या बुद्धिमत्तांपैकी केवळ एक प्रकार आहे. प्रत्यक्षात बुद्धिमत्तांचे अनेक प्रकार असून, प्रत्येक मनुष्याला त्यांपैकी काही बुद्धिमत्ता प्राप्त झालेल्या असतात. असा कोणताही मनुष्य असत नाही की ज्याला एकही बुद्धिमत्ता मिळालेली नाही; तसेच असा एकही मनुष्य नसतो की ज्याला सर्वच बुद्धिमत्ता प्राप्त झालेल्या आहेत. प्रत्येक मनुष्यास बुद्धिमत्तांचा एक पट प्राप्त झालेला असतो. म्हणजे असे की, प्रत्येकालाच तीन-चार प्रकारच्या बुद्धिमत्ता मिळालेल्या असतात. त्यांपैकी एखादी खूप तीव्र असेल तर एखादी तुलनेने कमी असेल. तर एखाद्या प्रकारची बुद्धिमत्ता अजिबात नसेलच. त्यामुळे, आपल्याला एखाद्या प्रकारची बुद्धिमत्ता नसेल तर काहीच वाईट वाटायला नको. कारण आपल्याला दुसऱ्या कुठल्यातरी प्रकारची बुद्धिमत्ता निश्चितच प्राप्त झालेली असते. आणि

एखाद्याला. एखादी विशिष्ट प्रकारची बुद्धिमत्ता छान असेल तर त्याला त्याचा अहंकारही वाटायला नको. कारण, त्याला दुसऱ्या कुठल्यातरी प्रकारची बुद्धी फारशी नसते किंवा अजिबातही नसते.

याचा अर्थ असा की शाळेत काही मुले 'हुशार' असतात तर काही मुले 'ढ' असतात ही आपली समजूत चुकीची आहे. त्यामुळे शिक्षकांनी ही भाषा आता बदलली पाहिजे. शाळेतील आजच्या व्याख्येनुसार जो मुलगा हुशार असतो तो दुसऱ्या कुठल्यातरी बाबतीत कमी हुशार असतो किंवा चक्क ढ असतो. तर ज्याला एरवी आपण ढ म्हणत होतो तो मुलगा दुसऱ्या कुठल्यातरी बाबतीत खूपच हुशार असणार हे नक्कीच !

नवीन संशोधनातून आणखीही एक गोष्ट आढळून आली आहे. बुद्धिमत्ता ही आनुवंशिक असते अशी जी आजवरची अनेकांची समजूत होती तीही चुकीची आहे. त्यामुळे बौद्धिक कार्याचा मक्ता काही ठराविक कुटुंबांतून असतो असे मानणेही गैर आहे. त्यामुळे ज्या समाजगटांना शिक्षणाची संधीच मिळाली नसेल त्यांच्यातील अनेकांना असलेली अनेक प्रकारची बुद्धिमत्ता वाया जाण्याची शक्यता आहे. असे आजवर शेकडो वर्षे घडत आलेले आहे. अनेक कलावंत, खेळाडू, शास्त्रज्ञ, कारागीर यांमधून निर्माण होण्यापूर्वीच नाहीसे झाले आहेत. आणि अजूनही जर शिक्षणाच्या संधी त्यांच्यापर्यंत पोचल्या नाहीत तर देशाची फार मोठी बौद्धिक संपत्ती तर वाया जाईलच पण समाजात विषमताही दुर्दैवाने टिकून राहील. यासाठी शिक्षणाच्या संधी सर्वांनाच उपलब्ध होण्याची गरज आहे.

आता शालेय पातळीवर सबंध शिक्षणव्यवस्थाच बदलावी लागेल. प्रत्येक मुलामध्ये कोणकोणत्या बुद्धिमत्ता आहेत, त्यांची कमी-अधिक तीव्रता कशी आहे, कमी असणाऱ्या बुद्धिमत्ता कशा वाढवता येतील, या गोष्टींवर शालेय शिक्षणाच्या सुरुवातीस भर द्यावा लागणार आहे. शिक्षकांना हे कसे करायचे याचे प्रशिक्षण द्यावे लागेल. वेगवेगळ्या मुलांमधील वेगवेगळ्या बुद्धिमत्तांचा शोध घेण्याच्या संधी सार्वत्रिकरित्या शाळांमधून निर्माण कराव्या लागतील. मुख्य म्हणजे, वर्गात कुणीच हुशार नाही आणि कुणीच ढ नाही याची नक्की खूणगाठ शिक्षकांना आपल्या मनाशी घालावी लागेल.

आता, 'बुद्धिमत्तांचा शोध घेते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या नव्याने करावी लागेल.

(इंटरनेटवरून मिळालेल्या माहितीच्या आधारे)

# ७ अमेरिकेतील कुटुंबे टिकणार ?

अमेरिकेत वेगाने मोडकळीस येणारी कुटुंबव्यवस्था हा तेथील समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोणातून एक काळजीचा विषय झाला आहे. गेल्या पन्नास वर्षात अमेरिकेच्या समाजजीवनात जे काही बदल झाले, त्यातील हा एक महत्त्वाचा बदल आहे. शिकागो विद्यापीठाने याविषयी नुकतेच काही संशोधन करून अहवाल प्रसिद्ध केला आहे.

१९६० ते १९९६ या काळात अमेरिकेतील घटस्फोटांचा दर दुपटीने वाढला असून कुमारी मातांची संख्याही ५ टक्क्यांवरून ३२ टक्क्यांवर पोचली असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. अमेरिकेच्या कुटुंबव्यवस्थेची रचनाही आता बदलत आहे. १९७२ मध्ये रीतसर लग्न करून कुटुंबव्यवस्था व मुलाबाळांची जबाबदारी स्विकारणाऱ्या जोडप्यांची संख्या ७२ टक्के होती. म्हणजेच ७२ टक्के मुले आपल्या खऱ्या आई-वडिलांजवळ राहत होती. १९९८ मध्ये मात्र फक्त ५२ टक्के मुले अशा कुटुंबात राहतात असे आढळले आहे. एकविसाव्या शतकात तर आई-वडिलांजवळ राहणाऱ्या मुलांच्या संख्येत या ना त्या कारणाने मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

विवाहित आई-वडील आणि त्यांची अपत्ये यांची टक्केवारी १९७२ मध्ये ४५ टक्के होती, ती आता २६ टक्के एवढी घसरली आहे. अमेरिकेत सध्या कुटुंबाची सर्वमान्य पद्धत म्हणजे अविवाहित पुरुष-स्त्रियांचे, अपत्यांचा विचार न करता एकत्र राहणे ही आहे. 'डीआयएनके' (DINK) हा गटही येथे लोकप्रिय आहे. याचा अर्थ 'डबल इनकम नो किड्स' असा आहे. मुले नकोत व कुटुंबव्यवस्थेचे बंधन नको असे म्हणणाऱ्यांच्या संख्येत १९७२ पासून १९९८ पर्यंत दुपटीने वाढ झाली आहे ही काहींना काळजीची बाब वाटते. अमेरिकेत सध्या ६२ टक्के घरांमध्ये मुले नाहीत. १९७२ मध्ये मुले नकोत असे म्हणणारी ४५ टक्के कुटुंबे होती.

अमेरिकन स्त्री व पुरूष बऱ्याच उशीरा विवाह करतात आणि बहुतेक वेळा त्यांचे 'ट्रायल मॅरेज' असते. त्यामुळे जोडीदाराबरोबर सूर जुळले तर ठीक अन्यथा दोघांनी आपापला मार्ग पत्करायचा, अशी येथील समाजमान्य पद्धत आहे. तसेच अमेरिकेतील तिशीच्या मुली व स्त्रियांच्या विचारसरणीत मोठ्या प्रमाणावर बदल होत असून विवाहबंधनात अडकणे वा विवाह टिकविणे या गोष्टीला त्या फारसे महत्त्व देत नाहीत असे आढळले आहे.

विवाहानंतरच्या कौटुंबिक जीवनातही बऱ्याच प्रमाणात बदल झाले आहेत. कुटुंबासाठी पुरूषांनी अर्थार्जन करायचे आणि स्त्रियांनी घर सांभाळायचे या पारंपरिक रचनेत बदल झाला आहे. पूर्वी ५३ टक्के असणाऱ्या अशा कुटुंबांच्या संख्येत घट झाली असून ती आत २१ टक्क्यांवर आली आहे. येथील एक चतुर्थांश स्त्रियांची मिळकत, नवऱ्याच्या मिळकतीपेक्षा जास्त आहे. एकंदरीत एकविसाव्या शतकात अमेरिकेतील कुटुंबव्यवस्था टिकेल का असा प्रश्न आहे.

अमेरिकेत व्यक्तिस्वातंत्र्याला अवाजवी महत्त्व देण्यात आले म्हणून असे होत असावे असेही म्हटले जाते. पण व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याची तयारी मात्र फारच कमी लोकांची असते हेही तेवढेच खरे आहे.

कुटुंबव्यवस्थेतील एका गोष्टीत मात्र कोणताच बदल झालेला नाही. ती म्हणजे स्त्रियांनी अर्थार्जन करणे व पुरूषांनी घरकाम करणे. ही संख्या फक्त सहा टक्के एवढी आहे. त्यामुळे अमेरिकेतदेखील पुरूष पार्टीची तयारी करतोय व स्त्री टी.व्ही.वर मॅच बघतेय असे चित्र बघायला मिळणे तसे दुर्लभच !

(द इकॉनॉमिस्ट २७ नोव्हेंबर ९९)

■■

### *संवेदनशीलता*

*संवेदनशीलता म्हणजे आपल्या भोवतालच्या सर्व गोष्टींबद्दल - वनस्पती, पशू, वृक्ष, आकाश, नदीचे पाणी, उडत जाणारा पक्षी, भोवतालच्या माणसांच्या मनाचा कल, जवळून जाणारा अपरिचित माणूस - या सर्वांबद्दल संवेदनशीलता (जाणीव) पाहिजे. या संवेदनशीलतेमुळे, पूर्वनियोजित नसलेली अशी उत्स्फूर्त व निःस्वार्थी प्रतिक्रिया उत्पन्न होते, आणि तीच खरी नीतिमत्ता व खरा सदाचार होय. संवेदनशील असल्यामुळे मूल मनमोकळेपणाने वागेल, लपवा-छपवी करणार नाही. म्हणून मग शिक्षकाने नुसती सूचना केली तरी ती प्रतिकाराशिवाय किंवा संघर्षाशिवाय सहजपणे मान्य केली जाईल.*

*जे. कृष्णमूर्ती यांच्या 'भावी जीवन' यापुस्तकातून*

# ८ मुक्त जागतिक व्यापार

एकविसाव्या शतकात मुक्त जागतिक व्यापार हा बहुतेक राष्ट्रांमध्ये फार मोठा वादग्रस्त मुद्दा ठरण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील सिएटल येथे झालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्री पातळीवरील परिषदेच्या वेळी (नोव्हेंबर-डिसेंबर १९९९) मुक्त जागतिक व्यापाराला अमेरिकेतील अनेक समाजघटकांकडून मोठा विरोध करण्यात आला. त्याविषयीचे वृत्त विविध प्रसारमाध्यमांद्वारे आपल्यापर्यंत पोचले असले तरी हा विषय गंभीर आणि किचकट आहे व त्याचा आपल्याशी थेट संबंध नाही, असे समजून त्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. पण भारताच्या नव्या आर्थिक धोरणांच्या संदर्भात हा विषय फार महत्त्वाचा आहे.

या लेखात 'इंडिया टुडे', 'द इकॉनॉमिस्ट', 'द इकॉनॉमिक टाईम्स', 'टाईम्स ऑफ इंडिया', 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली', इंटरनेटवर उपलब्ध असलेली माहिती आणि इतर काही ठिकाणी प्रसिद्ध झालेल्या विचारांचे संकलन करण्यात आले आहे. चर्चेच्या काही बाजू तरी स्पष्ट व्हाव्या हा उद्देश यामागे आहे. मात्र या लेखात 'अर्थबोधपत्रिके'तर्फे कोणतेही निष्कर्ष काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे यात व्यक्त झालेली मते संस्थेची वा संपादकांची नाहीत याची वाचकांनी जाण ठेवावी. तसेच या लेखातील अनेक मुद्दे वा विषय हा स्वतंत्र लेखनाचा विषय असल्याने तो येथे त्रोटक वाटण्याची शक्यता आहे.

## गोंधळाचे चित्र

जागतिक व्यापार संघटनेच्या परिषदेच्यावेळी अमेरिकेतील कामगार संघटना, जगभरातील काही पर्यावरणवादी संघटना, मागास किंवा विकसनशील देशांतील पर्यायी विकासनीती बाबत जागरूक असलेल्या संस्था, काही ग्राहक संघटना, खुल्या व्यापारामुळे परकीय वस्तूंची आयात वाढल्यास आपले नुकसान होईल, असे मानणाऱ्या अमेरिकेतील उद्योजकांचा गट या सर्वांनी एकत्रितपणे जागतिक व्यापार संघटनेविरुद्ध आवाज उठविला. मुक्त जागतिक व्यापार हा हानीकारक आहे, असा या सर्वांचा सूर असल्याने आणि या व्यापार परिषदेत काही ठोस निर्णय न झाल्याने मुक्त जागतिक व्यापाराबाबत गोंधळाचे चित्र निर्माण झाले. त्यामुळे मुक्त जागतिक व्यापाराला प्रोत्साहन देणारा गट हा पर्यावरणाची काळजी न करणारा, विकसनशील

देशांवर आर्थिक सत्ता गाजविणारा, कामगारांचे नुकसान करणारा आहे, असा समज समाजात पसरल्याचे आढळते.

दुसऱ्या बाजूने मुक्त जागतिक व्यापाराला विरोध करणाऱ्या या संघटना व संस्था, आर्थिक विकास व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विनाकारण अडथळा निर्माण करतात, त्यामुळे तेच प्रगतीचे विरोधक आहेत असाही अनेकांचा समज झाल्याचे आढळते. मुक्त जागतिक व्यापाराला, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला विरोध करा किंवा करू नका, ते होणे अटळच आहे त्यामुळे काय होईल ते फक्त पाहावे असेही मानणारा एक तिसरा गट आहे. या तीनही गटांचे 'म्हणणे' काय ते आपण समजून घेऊ.

## खुल्या जागतिक व्यापाराला विरोध का ?

अमेरिकेतील कामगारांना वाटते की खुल्या व्यापारामुळे त्यांना स्पर्धेला सामोरे जावे लागेल व त्यांच्या नोकऱ्यांवर गदा येईल. विकसनशील राष्ट्रांमध्ये विविध क्षेत्रांसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असून त्या प्रमाणात त्यांना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत. अमेरिकेत मनुष्यबळ मर्यादित आहे त्यामुळे श्रम महाग आहेत. म्हणून कामगारांना भरपूर पगार आहे. आता इतर राष्ट्रातील मनुष्यबळ अमेरिकेकडे धावले तर अमेरिकेतील सर्वच क्षेत्रातील कामगारांना इतरांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. उदाहरणार्थ सध्या भारतातील संगणकक्षेत्रातील नोकऱ्यांमधील कर्मचाऱ्यांना अमेरिकेला जाण्याची संधी मिळतेय, हे तर आपणही बघतो आहोत. श्रम जास्त प्रमाणात उपलब्ध झाले की पगारही कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कामगार संघटनांचा विरोध आहे.

यातील राजकीय बाजू अशी की अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या प्रशासनावर कामगार संघटनांची घट्ट पकड आहे. अमेरिकेत वर्षभराने राष्ट्राध्यक्षपदासाठी निवडणुका होणार आहेत. त्यामुळे कामगार संघटनांचा पाठिंबा हा महत्त्वाचा ठरणार आहे. आपले मत हे महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन कामगार संघटनांनी क्लिंटन यांच्यावर, श्रम मानकांबाबत (Labour Standards) अमेरिकेने मुक्त जागतिक व्यापार परिषदेत आग्रही राहावे, यासाठी दबाव आणला. त्यामुळे अमेरिकेने विकसनशील राष्ट्रांमधील बालमजुरी व कामगारांचे शोषण हे मुद्दे महत्त्वाचे ठरविले. विकसनशील राष्ट्रांकडून व विशेषतः भारताकडूनच अमेरिकेच्या कामगारांना आव्हान आहे. मग हे आव्हान तर रोखायचे आणि व्यापार तर खुला हवा असेही म्हणायचे, तर हे दोन्ही कसे साधायचे? म्हणून कामगारांच्या संदर्भातील वर उल्लेखित

दोन मुद्यांवर विकसनशील राष्ट्रांना कोंडीत पकडायचे, असा अमेरिकेचा प्रयत्न होता. अर्थात भारतासह इतर सर्व विकसनशील राष्ट्रे अमेरिकेच्या दुटप्पीपणाला व दबावाला बळी पडली नाहीत. त्यामुळे अमेरिकेला याबाबतीत माघार घ्यावी लागली. तरी जाता जाता क्लिंटन यांनी, याबाबत एक स्वतंत्र कार्यगट नेमला जाईल, अशी घोषणा केलीच. तेव्हा भारताने हा मुद्दा आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेत घेता येईल, येथे त्याचे प्रयोजन नाही, असे म्हणून जोरदार विरोध केला. अखेरीस क्लिंटन यांनी तो गट अनौपचारिक राहील असे म्हणून सारवासारव केली.

पर्यावरणवाद्यांचे म्हणणे असे की मुक्त जागतिक व्यापारामुळे अनेक देशांचा आर्थिक फायदा होत असल्याचे आढळले तरी ते चित्र फसवे असते. विविध उत्पादने तयार करण्यासाठी अमेरिकेसह सर्वच राष्ट्रांमधील नैसर्गिक साधनसंपत्तीवर व्यापारीवर्ग, उद्योजक वर्ग आक्रमण करीत असतात. नैसर्गिक साधनसंपत्ती मर्यादित आहे. त्यातही अमेरिकेत व युरोपमध्ये पर्यावरण विषयक कडक कायदे आहेत व त्यांची अंमलबजावणी कसोशीने केली जाते. आर्थिक विकासाच्या नावाखाली विकसनशील राष्ट्रांमधील नैसर्गिक साधनसंपत्तीची अक्षरशः लूट करण्यात येते. त्यामुळे आज दिसत असलेली तात्कालिक आर्थिक प्रगती ही प्रगती नसून अधोगती असते. शिवाय आर्थिक प्रगतीचे सध्याचे निकषच त्यांना मान्य नाहीत आणि आर्थिक फायदा नेमका कुणाचा होतो हाही एक वादाचा मुद्दा आहे, असे पर्यावरणवादी म्हणतात.

विकसित राष्ट्रांनी आजपर्यंत अनुसरलेला विकासाचा मार्ग आपल्याला नवीन नाही. कारण, स्वातंत्र्योत्तर काळातच नव्हे तर त्यापूर्वीही शतकभर आपण तोच मार्ग अवलंबीत आहोत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर आधारित अशा प्रचलित विकास पद्धतीत, उपभोक्ता हा सार्वभौम (Sovereign) मानला जातो त्याला उपभोगाचे स्वातंत्र्य, म्हणजे त्याविषयीच्या निर्णयाचे स्वातंत्र्य बहाल केलेले असते. कोणत्या वस्तूसेवेचा उपभोग घ्यायचा हे ठरविण्याचा त्याचा अधिकार अबाधित असतो. याचबरोबर कोणत्या वस्तूसेवेचा किती उपभोग घ्यायचा याचे परिमाणही तो स्वेच्छेने ठरवू शकतो. मुख्य म्हणजे, जास्तीत जास्त समाधान प्राप्त करणे हेच त्याचे आर्थिक व्यवहारामागचे अंतिम उद्दिष्ट मानल्यामुळे, तसेच उपभोगाचे संख्यात्मक व गुणात्मक मान आणि समाधानाची पातळी ह्यांच्यात सरळ सहसंबंध असल्याचे तो गृहीत धरीत असल्यामुळे, अमर्याद समाधानासाठी अमर्याद उपभोगाची कास धरणे त्याला अपरिहार्य वाटते. वाढत्या उपभोगासाठी वाढते उत्पादन

आणि वाढत्या उत्पादनासाठी नैसर्गिक साधनांचा वाढत्या प्रमाणातील वापर असा हा सहसंबंध असतो. अमर्याद उपभोग, त्याच्या पूर्तीसाठी वाढते उत्पादन, आणि वाढत्या उत्पादनाच्या गरजेपोटी निसर्गशक्तींचे वाढते नि अमर्याद शोषण अशी ही कृती-मालिका असते. निसर्गातील उपलब्ध हवा, जमीन, पाणी, वने यांच्या अमर्याद वापरांमुळे वार्षिक (चालू) निर्मितीच संपते असे नव्हे, तर निसर्गाची भविष्यकालीन निर्मितीची क्षमताच खुंटते. हा सर्वात मोठा धोका या प्रचलित विकासनीतीने आपल्यापुढे उभा केलेला आहे.

वेगवेगळे उद्योगधंदे निर्माण करून विविध उत्पादनांची निर्मिती करताना जमीन, हवा, जमिनीतील पाणी, नद्या, समुद्र या सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते, जंगलतोड होते त्यामुळे पाऊस, थंडी, ऊन यासंबंधीचे नैसर्गिक चक्र बदलते, अशा अनेक तक्रारी पर्यावरणवादी करतात. अमेरिकेत पर्यावरणाविषयीचे कडक कायदे असल्याने इतर देशातही तसेच कडक कायदे करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. कामगारविषयक व पर्यावरणविषयक मुद्दे मुक्त जागतिक व्यापाराशी संलग्न असू नयेत, असे भारताला वाटते. या दोन्ही प्रश्नांसाठी इतर व्यासपीठे उपलब्ध आहेत असे मत भारतातर्फे यावेळी व्यक्त करण्यात आले.

मुक्त जागतिक व्यापाराला विरोध करणाऱ्या ग्राहक संघटना म्हणतात की या व्यापारामुळे ग्राहकांवर विविध प्रक्रिया केलेले अन्न खाण्याची वेळ येते, तसेच या क्षेत्रातील छोट्या छोट्या गटांना डावलून मोठ्या उद्योगांचे हित जपण्यात येते, त्यामुळे असा व्यापार नकोच. अमेरिकेच्या बाजारपेठेतील छोट्या छोट्या वस्तूंवर चीन व जपानमधील वस्तूंनी आक्रमण केले आहे. त्यामुळे अमेरिकन मालाला उठाव नाही. म्हणून व्यापार हा, 'जागतिक नको तर स्थानिक (Not global but local) असावा' असेही ग्राहक संघटनांनी यावेळी आग्रहपूर्वक मांडले. मॅकडोनाल्ड या अमेरिकेतील मोठ्या कंपनीच्या एका दुकानाची मोडतोड करणाऱ्या फ्रेंच शेतकऱ्याला अशा निदर्शकांचा पाठिंबा मिळाला होता. हे उदाहरण बोलके आहे. मुक्त जागतिक व्यापार म्हणजे, 'विकास नाही विनाश आहे' असे मत विकासवादी संस्थांनी व्यक्त करून आपला विरोध स्पष्ट केला. जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांवर व्यापाराशी संबंधित म्हणजेच पर्यायाने आर्थिक वर्चस्व प्रस्थापित करण्याची शक्यता असते, म्हणूनही याला विरोध करावा, असाही एक मतप्रवाह आहे.

## मुक्त जागतिक व्यापार आवश्यक का ?

मुक्त जागतिक व्यापारामुळे आयात-निर्यात वाढून अर्थव्यवस्था बळकट होते असा दावा आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक अर्थतज्ज्ञ व मुक्त जागतिक व्यापाराचे समर्थक करतात. तसेच यामुळे स्पर्धा निर्माण होते, स्पर्धेमुळे उत्पादनांचा, सेवांचा दर्जा सुधारतो, पर्यायाने ग्राहकांचा फायदा होतो असाही मुद्दा मांडण्यात येतो. देशाचा व पर्यायाने नागरिकांचा आर्थिक विकास वेगाने करायचा असेल तर मुक्त जागतिक व्यापाराला, नवीन तंत्रज्ञान, नवनवी उत्पादने व सेवा, स्पर्धा याला पर्याय नाही असे हे समर्थक म्हणतात. अर्थात मुक्त जागतिक व्यापार उभयपक्षी फायद्याचा ठरावा हे यावेळी गृहीत धरले जाते. प्रत्यक्षात मात्र तसे घडले नाही तर वादाची स्थिती निर्माण होते. आणि सिएटल येथील परिषदेच्या वेळी नेमके हेच घडले. त्यामुळे जागतिकीकरणावर वादळ उठले.

मुक्त जागतिक व्यापार चालवायचा तर त्याला आंतरराष्ट्रीय कायदे हवेत, काही एक पद्धत हवी, व्यापाराचेही नियम-निकष असतात. हे जाणून जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली. या संघटनेद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळित व्हावा ही अपेक्षा आहे, असेही समर्थक म्हणतात.

## जागतिकीकरण होणे अटळ

तिसरा गट आहे, "मुक्त जागतिक व्यापाराला, जागतिकीकरणाला विरोध करा वा करू नका, हे सर्व होणारच आहे" असे म्हणणाऱ्यांचा. हा गट असे म्हणतो याची कारणे अशी - (१) तंत्रज्ञानाचा व विज्ञानाचा (विशेषतः संगणक तंत्रज्ञानाचा) शोध व उपयुक्तता, (२) विविध प्रसार माध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचा प्रचंड ओघ, परस्परांशी जलद संवाद साधण्याच्या विविध सोयी, (३) चलनाच्या बाजारातील सुलभ झालेली देवघेव, म्हणजे पैशाच्या स्वरूपातील आर्थिक उलाढालींचे बदलते स्वरूप.

या गटाला असे वाटते की, मुक्त जागतिक व्यापार हा भांडवलशाहीला व अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रांना नकोच आहे तसेच तो चीनसारख्या साम्यवादी-समाजवादी राष्ट्रांनाही नको आहे. पण त्यांना हा व्यापार वरील तीन कारणांमुळे रोखता येणे शक्य नाही, म्हणून किमान आपापल्या देशांचे हित जपता यावे, यासाठी ही राष्ट्रे आर्थिक उदारीकरणाला महत्त्व देतात. पण जेव्हा हे हित जपले जात नाही असे दिसते, तेव्हा 'गॅट' (GATT) सारख्या करारांना अमेरिका, फ्रान्स व भारतासारख्या अनेक देशांमध्ये

विरोध होतो आणि जागतिक व्यापार संघटनेविरूद्ध निदर्शने केली जातात. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे बदलते स्वरूप लक्षात घेऊन संरक्षणवादी (प्रोटेक्शनिस्ट) भूमिका घेणे कदाचित योग्य ठरणार नाही, पण मुक्त जागतिक व्यापाराला डोळे मिटून पाठिंबा द्यावा, असेही म्हणता येणार नाही. तेव्हा तारतम्याने विचार करून हे सर्व स्विकारायचे, पण ते कसे ? याच्या तपशिलाचा विचार करणे समंजसपणाचे ठरेल, असे मत या गटातर्फे व्यक्त करण्यात येते.

आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ वरील गटातील व्यक्ती म्हणतात की १९७० च्या दशकापर्यंत साम्यवाद महत्त्वाचा समजला जात होता. पण सोव्हिएट रशियाचे विघटन, साम्यवादी राष्ट्रांची समाजवादाकडे, लोकशाहीकडे होणारी वाटचाल, गोर्बाचेव्ह यांची ग्लासनॉस्त व पेरेस्त्रोईका ही धोरणे, अर्थव्यवस्था बंदिस्त असणाऱ्या चीनमध्ये प्रवेश करणारे मुक्त व्यापाराचे व लोकशाहीचे वारे, व्हिएटनाम युद्धात अमेरिकेची झालेली हार, इराण-इराक युद्ध, आर्थिक क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाढता प्रभाव, त्यानंतर आलेले संगणकयुग या महत्त्वाच्या घटनांकडे नजर टाकली असता असे आढळते की अशा घडामोडी रोखणे हे कोणाच्याच हातात नसते. म्हणूनच आजपासून दहा किंवा वीस वर्षांनी जगाची स्थिती कशी असेल हे सांगता येत नाही. त्यामुळे आहे त्या परिस्थितीला समजून घेऊन भविष्यातील घडामोडींबाबत सतर्क राहिले पाहिजे. जागतिकीकरण हे भांडवलशाही राष्ट्रांचे किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांचे कट कारस्थान नाही. कारण, यामुळे त्यांनाही काही तोटे सहन करावे लागणार आहेतच, असेही हा गट म्हणतो.

## नव्या मुक्त जागतिक व्यापाराची पार्श्वभूमी

मुक्त जागतिक व्यापाराबाबतचे सध्याचे वाद लक्षात घेतल्यानंतर आपण मुक्त जागतिक व्यापाराच्या नवीन इतिहासाचा एक छोटा धावता आढावा घेऊ. खरं म्हणजे मुक्त जागतिक व्यापार ही नवीन बाब नाही. फार पूर्वी देखील व्यापारी आपापली गलबते भरून व्यापाराला देशोदेशी फिरायचे. पण त्यावेळी आत्ताच्या विज्ञान, तंत्रज्ञानाचा प्रसार झाला नव्हता. ते व्यापाराचे तंत्र वेगळेच होते.

दुसऱ्या महायुद्धानंतर खरे तर या नवीन मुक्त जागतिक व्यापाराची सुरुवात झाली असे म्हणता येईल. 'गॅट' ची (जनरल अॅग्रीमेंट ऑन ट्रेड अॅंड टॅरिफ - GATT) सुरुवात १९४७ मध्ये २३ देशांनी मिळून केली. यात

भारताचाही समावेश आहे. देशादेशांमध्ये व्यापार मुक्त, खुला असावा यासाठी कोणकोणते निर्बंध हवेत, नकोत हे ठरविण्यासाठी हा करार अस्तित्वात आला. १९८६ मध्ये यासंबंधीच्या चर्चेसाठी 'उरुग्वे' येथे चर्चेची फेरी सुरू झाली. (१९४७ ते १९८६ या काळाचा 'गॅट'चा वेगळा आढावा हाच एका स्वतंत्र लेखाचा विषय होईल.) १९९० मध्ये ही चर्चेची फेरी संपेल असे ठरविण्यात आले. पण १९९० मध्ये ही चर्चा संपली नाही. 'गॅट'चे प्रमुख ऑर्थर डंकेल यांच्या प्रस्तावावर चर्चेचे वादळ उठले. अखेरीस १९९५ मध्ये उरुग्वे चर्चेची फेरी संपली.

दरम्यान १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली. तेव्हाच 'गॅट' हा जागतिक व्यापार संघटनेचाच एक भाग झाला. उत्पादने व सेवा याक्षेत्रात मुक्त व्यापार असावा यासाठी संघटनेने प्रयत्न करावेत असे ठरले. यानंतर उत्पादनांचा खुला व्यापार, सेवाक्षेत्रात खुला व्यापार व व्यापाराशी संबंधित बौद्धिक संपदा हक्क (Trade related intellectual property rights - TRIPS) अशा तीन भागात या संघटनेचे कार्यक्षेत्र राहील असे ठरविण्यात आले. १९८६ ते १९९० या काळात भारतात गॅट व डंकेल प्रस्तावावर बरीच चर्चा व वाद झाले. १९९१ च्या नव्या आर्थिक धोरणानंतर मात्र हे स्वरूप बदलले. १९९० च्या दशकात माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या बदलांमुळे मुक्त जागतिक व्यापाराच्या चित्रात अनेक रंग मिसळले. त्याच्या वेगवेगळ्या छटा हे वेगवेगळे वाद झाले. १९९९ च्या अखेरीस सिएटल येथे मुक्त जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्री पातळीवरील बैठकीच्या वेळी हेच वेगवेगळे वाद समोर आले. या चर्चेच्या वेळी श्रममानके (Labour Standards) आणि पर्यावरण या विषयांचा मुक्त जागतिक व्यापाराशी संबंध जोडायचा का, असल्यास कसा हेच प्रामुख्याने चर्चेचे मुद्दे होते. म्हणून वरील विषयांशी संबंधित संघटनांनी जागतिक व्यापार संघटनेच्या नूतन धोरणांना विरोध केला आहे.

मुक्त जागतिक व्यापाराच्या वरील पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकात व्यापार हा कळीचा मुद्दा ठरेल हे निश्चित.

■■

# अर्थबोधपत्रिका

## अर्थबोधपत्रिकेचे सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज

दिनांक :

संपादक, 'अर्थबोधपत्रिका',
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

सस्नेह नमस्कार,

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून अंक क्रमांक ______ पासून नोंदवून घ्यावे. पुढील सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / चेकने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठविण्यात येत आहे. चेक / ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे : ______________________

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता : ______________________

______________________

______________________

______________________

______________________ | | | | | | |

इतर माहिती :

संबंधित संस्थेचे नाव व पत्ता : ______________________

______________________

______________________

______________________

______________________ | | | | | | |

______________________
सही

## सूचना

- पुण्याबाहेरचा चेक असल्यास वटणावळीसाठी (कमिशनसाठी) पंधरा रुपये जादा पाठवावेत. चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत.
- देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे.
- या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतीद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता.
- आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

## 'अर्थबोधपत्रिका' विनामूल्य मिळविण्याची योजना

अंकातील विषय व त्यासंबंधी सखोल अभ्यासपूर्ण लेख लक्षात घेता असे नियतकालिक आपल्या संग्रही असावे असे अनेकांना वाटणे साहजिकच आहे. तथापि काही होतकरू वाचकांना देणगीमूल्य भरून अंक घेणे शक्य नसल्यास अशांना विनामूल्य अंक मिळविण्यासाठी आम्ही एक योजना तयार केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :

- या योजनेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिस एकावेळी कमीत कमी पाच नवीन देणगीदार मिळवून द्यावे लागतील.
- अशी जमा केलेली देणगीमूल्याची रक्कम (कमीत कमी रु. २५०/-) एकत्रीतपणे देणगीदारांच्या सभासदत्वाच्या अर्जासहित रोख, डिमांड ड्राफ्ट. किंवा मनिऑर्डरने आमच्याकडे पाठवावी लागेल. (या योजनेखाली चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही)
- अशा रितीने देणगीमूल्य देणारे कमीत कमी पांच नवीन सभासद मिळवून देणारांस 'अर्थबोधपत्रिके'चे पुढील सहा अंक वर्षभर विनामूल्य पाठविले जातील.
- ही योजना अल्पकाळापुरतीच मर्यादित असून पुरेशी सभासद नोंदणी झाल्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता ती बंद करण्यात येईल.

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. वि. म. दांडेकर यांच्या पुढाकाराने १९७० साली स्थापन करण्यात आली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून 'अर्थबोधपत्रिका' प्रकाशित केली जात आहे.

## - संस्थेचे मंडळ -

स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर
आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ • के. एन्. राज
व्ही. एम्. राव • दि. चं. वधवा • सु. म. विद्वांस
ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर

---

**प्रेषक :**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

'अर्थबोध',

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

पुणे - ४११ ०१६.

फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०

ई-मेल : ispe@vsnl.com